दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

* संपादक : काकासाहेब नवले * RNI No. MAHMAR/2019/82605 * वर्ष ७ वे * पाने ८ * मुल्य रु. ४.००
* अंक ९८ * शुक्रवार १६ जानेवारी २०२६ * पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282

## निर्यातक्षम राज्यांत महाराष्ट्र आघाडीवर

नवी दिल्ली : नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांक-२०२४ मध्ये (ईपीआय) महाराष्ट्राने तामिळनाडूला मागे टाकत पहिले स्थान पटकावले आहे. देशातील पाच राज्यांत गुजरात, उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेशचा अनुक्रमे तीन, चार आणि पाचवा क्रमांक लागतो. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या यादीनुसार, महाराष्ट्राने तामिळनाडूकडून पहिले स्थान संपादन केले आहे. आर्थिक वर्ष २०२२ ते २०२४ या कालावधीत केलेल्या कामगिरीवरून ही यादी तयार करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२२ मध्ये तामिळनाडूचा पहिला क्रमांक होता. खालोखाल महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आणि हरियाणाचा क्रमांक लागत होता. आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, 'ईपीआय २०२४'ची क्रमवारी 'ईपीआय २०२२'शी तुलना करण्यायोग्य नाही. कारण, राज्यांचे मूल्यांकन करण्याची संपूर्ण कार्यपद्धती बदलली आहे. लहान राज्ये, ईशान्येकडील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या क्रमवारीत, उत्तराखंडने अव्वल स्थान पटकावले आहे. त्यानंतर जम्मू आणि काश्मीर, नागालँड, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, गोवा यांचा क्रमांक लागतो.

# महायुतीचाच बोलबाला!

## २९ महानगरपालिकांसाठी मतदान पूर्ण; आज निकाल

### एक्झिट पोल जाहीर : मुंबई-ठाण्याचा युतीला कौल, पुणे- पिंपरी चिंचवडमध्ये चुरस

**मुंबई : महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी गुरुवारी मतदान पार पडले. सुमारे ३.४८ कोटी मतदारांनी आपला हक्क बजावला. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असून, मतमोजणी आज शुक्रवारी (१६ जानेवारी) होईल. तत्पूर्वी, विविध एक्झिट पोल संस्थांनी जाहीर केलेले कल राज्यातील राजकीय वातावरण तापवून सोडले आहेत.**



मतदानानंतर समोर आलेल्या एक्झिट पोलमध्ये मुंबईसह प्रमुख महापालिकांमध्ये महायुती (भाजप-शिवसेना शिंदे गट) ची आघाडी दिसत आहे, तर पुणे-पिंपरी चिंचवडमध्ये काँग्रेस-एनसीपी (अजित पवार गट) आणि भाजप यांच्यात चुरस आहे.

राज्यभरातील अनेक मतदान केंद्रांवर गोंधळही पाहायला मिळाला. अनेक ठिकाणी बोगस मतदार आढळले, काही ठिकाणी मतदारांची नावेच गायब झाली होती, तर काही ठिकाणी विरोधी गटांमध्ये हाणामारीच्याही घटना घडल्या. तसेच, मतदान करण्याआधी बोटाला लावली जाणारी शाई देखील पुसली जात असल्याने, विरोधी पक्षांनी यावरून निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली. एकूणच दिवसभरात वातावरण गोंधळाचच राहिली.



नाशिकमध्ये (१२२ जागा) भाजप आणि महायुतीची मजबूत स्थिती दिसत आहे, तर ठाकरे गट आणि इतरांना आव्हान आहे. एक्झिट पोलमध्ये महायुती आघाडीवर असल्याचे संकेत आहेत.

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे), उद्धव सेना आणि एमआयएम यांच्यात चुरस आहे. एक्झिट पोलमध्ये महायुतीला फायदा होण्याचा अंदाज आहे, तर शिवसेनेच्या वेगवेगळ्या गटांमुळे ठाकरे गटाला नुकसान होऊ शकते.

एक्झिट पोलनुसार पनवेलमध्ये सर्वात मोठा पक्ष भाजप ठरत आहे, या ठिकाणी भाजपला ४७ जागा मिळत आहेत. तर ठाण्यात शिवसेनेने गड राखला असून(पान ४ वर)



### मुंबईत ठाकरे बंधूचा प्रयोग फसला?

मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी झालेल्या मतदानात २५ वर्षांनंतर सत्ता बदलण्याची शक्यता एक्झिट पोल दाखवत आहेत.

महायुती (भाजप + शिवसेना शिंदे गट): १३१ ते १५१ जागा (बहुमत ११४)
शिवसेना (उद्धव ठाकरे) + मनसे + इतर: ५९ ते ७५ जागा
काँग्रेस + इतर: २०-२५ जागा

ॲक्सिस माय इंडिया, जनमत, रुद्रा आणि जेव्हीसी सारख्या संस्थांच्या पोलमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज आहे.

### पुणे महानगरपालिकेवर भाजपचे वर्चस्व

पुणे महापालिकेत (१६२ जागा) पुन्हा एकदा भाजपाचे वर्चस्व कायम राहण्याचा अंदाज आहे.

भाजप: ९३ जागा
राष्ट्रवादी (अजित पवार गट): ४३ जागा
राष्ट्रवादी (शरद पवार गट) + काँग्रेस: प्रत्येकी ८ जागा
शिवसेना (उद्धव): ७ जागा
शिवसेना (शिंदे): ६ जागा

पीआरएबी आणि जनमत एक्झिट पोलनुसार, भाजप-अजित पवार गटाची युती सत्तेसाठी मजबूत ठरू शकते, तर शरद पवार गटाला मोठा फटका बसण्याची शक्यता.

## भाजप-राष्ट्रवादीचा गड मजबूत!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** निवडणुकीत मतदान पार पडल्यानंतर एक्झिट पोलचे कल समोर आले आहेत. अहिल्यानगर महापालिकेत भाजप आणि अजित पवार गट राष्ट्रवादीचा गड मजबूत असून स्पष्ट आघाडी घेतल्याचे दिसत आहे. साम टीव्ही आणि इतर प्रमुख एक्झिट पोलनुसार, आ. संग्राम जगताप व विखे पाटील गटाचे पारंपरिक वर्चस्व कायम राहण्याची शक्यता आहे, तर एकनाथ शिंदे गट शिवसेनेला मोठा धक्का बसताना दिसतो.

**अहिल्यानगर महानगरपालिका**





भाजप-अजित पवार गटाच्या युतीला स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज आहे. हे महायुतीचे मजबूत गट असून, स्थानिक पातळीवर विखे पाटील यांच्या प्रभावामुळे सत्ता कायम राहण्याची शक्यता जास्त आहे. शिंदे गटाला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळत असल्याने विरोधात बसावे लागू शकते. एक्झिट पोल हे केवळ अंदाज असून, अंतिम निकाल आज (१६ जानेवारी) सकाळी १० वाजेपासून सुरू होणाऱ्या मतमोजणीनंतरच स्पष्ट होईल. मतदारांच्या कौलाने स्थानिक राजकीय समीकरणे कशी बदलतील, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### अहिल्यानगर महानगरपालिका एक्झिट पोल

**भाजप : १९ जागा**
**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): २४ जागा**
**शिवसेना (एकनाथ शिंदे गट): १४ जागा**
**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट): ४ जागा**
**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट): ४ जागा**
**काँग्रेस: २ जागा**
**बहुजन समाजवादी पक्ष / इतर: १ जागा**

## महत्त्वाचे..

### ममता बॅनर्जींना सर्वोच्च न्यायालयाकडून झटका!

**नवी दिल्ली :** कोलकाता येथील निवडणूक रणनीती बनवणारी संस्था 'आय-पीएसी'वरील अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) छापेमारी आणि त्यामध्ये पश्चिम बंगाल सरकार व पोलिसांच्या कथित हस्तक्षेपासंदर्भातील वादावर सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि बंगाल सरकारला नोटीस बजावली आहे. पुढील सुनावणी ३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. तसेच, ईडी अधिकाऱ्यांविरुद्ध दाखल तक्रारीलाही सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे आदेश दिले आहेत की घटनेशी संबंधित सर्व सीसीटीव्ही फुटेज आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे सुरक्षित ठेवले जावेत. न्यायालयाने असेही म्हटले आहे .

## सलग तीन वस्त्यांवर दरोडा

### तलवार-चाकूच्या धाकात लाखोंचा ऐवज लंपास, तिघे गंभीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बोधेगाव :** येथे बाडगव्हाण रस्त्यालगत असलेल्या खिळे वस्ती व वैद्य वस्तीवर मध्यरात्री सुमारे आठ ते दहा दरोडेखोरांनी शस्त्रांसह घुसखोरी करत भीषण दरोडा टाकल्याची घटना घडली.

दरोडेखोरांनी तलवार व चाकूचा धाक दाखवून महिला-पुरुषांना जबर मारहाण केली व रोख रक्कम तसेच सोने-चांदीचे दागिने असा लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला. या हल्ल्यात तीन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बोधेगाव येथील बाडगव्हाण रस्त्यालगत शेतात वस्तीवर राहणारे कचरू श्रीपती खिळे हे आपल्या कुटुंबासह (पान ४ वर)

■ अहिल्यानगर येथून श्वान पथक सकाळी दाखल झाले असून त्यांनी माग दाखविला आहे तर पिढीत एका कुटुंबात सीसीटीव्ही कॅमेरात दरोडेखोर कैद झाले आहे. त्यादृष्टीने तपास होण्याची शक्यता आहे.



#### पोलिस उशिरा पोहोचले

परमेश्वर खिळे हे कसाबसा दरोडेखोरांच्या तावडीतून पळून बोधेगाव पोलिस दूरक्षेत्रात पोहोचले. मात्र तेथे एकच पोलिस कर्मचारी उपस्थित होता. माहिती दिल्यानंतर शेवगाव पोलिस ठाण्याला कळवण्यात आले. त्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले, मात्र तोपर्यंत दरोडेखोर पसार झाले होते.

#### पोलिस दूरक्षेत्र बेवारस...

बोधेगाव पोलिस दूरक्षेत्रात एक पोलिस उपनिरीक्षक व पाच कर्मचारी नियुक्त असतानाही त्यांना शेवगाव येथे ड्युटीवर पाठवले जात असल्याने बोधेगाव येथे अनेकदा एकही कर्मचारी हजर राहत नाही. त्यामुळे पोलिस दूरक्षेत्र अक्षरशः बेवारस राहिल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

#### नागरिकांची मागणी

या गंभीर दरोड्याचा तातडीने तपास करून आरोपींना अटक करण्यात यावी तसेच रात्रीची पोलिस गस्त वाढवावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

#### हल्ल्यात पोलिस कर्मचाऱ्याचा आई वडिलांचा समावेश...

नेवासा पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या आप्पासाहेब वैद्य हे ड्युटीवर असून घरी आई रुक्मिणी वडील पांडुरंग वैद्य हे दोघे घरी असताना त्यांच्यावर दरोडेखोरांनी हल्ला केला.

## मतदानाचा टक्का घसरला!

### मतदारांमधील निरुत्साह चिंतेचा विषय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** तब्बल ९ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी आज उत्साहात मतदान पार पडले. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा पाहायला मिळाल्या. यामध्ये १०० वर्षांच्या ज्येष्ठांपासून ते पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या ' झेन-झी ' मतदारांपर्यंत सर्वांचा सहभाग होता. मात्रमुंबई आणि पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये मतदारांमधीलनिरुत्साह चिंतेचा विषय ठरला आहे.

**महानगरपालिका मतदानाची टक्केवारी (%)**

**कोल्हापूर ५०.८५ (सर्वात जास्त)**
**परभणी ४९.१६**
**अहिल्यानगर ४८.४९**
**नवी मुंबई ४५.५१**
**ठाणे ४३.९६**
**नागपूर ४१.२३**
**पिंपरी चिंचवड ४०.५०**
**पुणे ३६.९५**
**जळगाव ३४.२७ (सर्वात कमी पैकी एक)**

मुंबईत दुपारी ३:३०वाजेपर्यंत केवळ ४१.०८% मतदान झाले होते. धक्कादायक बाब म्हणजेकुलाबा येथील वॉर्ड२२७ मध्ये याच वेळेपर्यंत अवघे १५.७३% मतदान नोंदवले गेले, जे राज्यातील सर्वात कमी मतदान असू शकते. ५:३०वाजेपर्यंतची अंतिम आकडेवारी आल्यानंतर टक्केवारीत वाढ होण्याची शक्यता आहे.

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता राज्यातील जनतेला सर्वाधिक उत्सुकता लागली आहे ती म्हणजे निकालाची होय. उद्या म्हणजेच शुक्रवारी १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होईल आणि पहिल्या ३ तासात राज्यातील सर्व पालिकेतील चित्र स्पष्ट होईल. दरम्यान मतदान झाल्यानंतर काही एक्झिटपोलचे अंदाज समोर आहेत. ज्यात मुंबई महापालिकेत भाजपला सर्वाधिक जागा मिळतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## झापुक । zupuk

एक विझले
तर दुसरे पेटले
एकमेकांच्या विरोधात
डरकाळ्या फोडू लागले
जाती जातीत
लढाई लावली
मूळ प्रश्नांना
तिलांजली दिली

**नवनाथ कुताळ**
**९४२२२३१८२५**

## प्रतिकूल स्थितीतही देशात ५१ अब्ज डॉलर विदेशी गुंतवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** जागतिक व्यापार अस्थिरतेतही भारताने जगभरातील गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला आहे. गत सहा महिन्यांत ५१ अब्ज डॉलरची विदेशी गुंतवणूक आकर्षिक झाली असल्याची माहिती 'डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटर्नल ट्रेड' (डीपीआयआयटी) चे सचिव अमरदीपसिंग भाटिया यांनी दिली.

'डीपीआयआयटी'च्या वतीने स्टार्टअपला बळ देण्यासाठी येत्या १६ जानेवारीला राष्ट्रीय स्टार्टअप दिवस साजरा करण्यात येणार आहे. या दिवसानिमित्त ७५ महाआव्हानांचा सामना नवउद्योजकांना करावा लागेल. नवकल्पना आणि उद्योगांना भेडसावणार्या अडचणींवर कल्पक उत्तर देऊ शकणार्यांना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. या महोत्सवाची माहिती देताना भाटिया यांनी 'एफडीआय'मधील गुंतवणुकीचा आढावा घेतला.

राष्ट्रीय स्टार्टअप दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी तीन हजारांहून अधिक प्रस्ताव आले आहेत. यावेळी देशातील २० स्टार्टअपला गौरविण्यात येणार आहे. देशातील उत्पादन क्षेत्राचा विस्तार करण्याचा केंद्र सरकारचा हेतू आहे. उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित होत असून, नवीन (पान ४ वर)

## अमेरिकेकडून रशिया, इराण आणि अफगाणिस्तानसह ७५ देशांच्या व्हिसावर बंदी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वॉशिंग्टन :** अमेरिकेने एका अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाद्वारे जगातील ७५ देशांच्या नागरिकांसाठी व्हिसा प्रक्रियेला स्थगिती दिली आहे. अमेरिकन स्टेट डिपार्टमेंटने (परराष्ट्र विभाग) या ७५ देशांमधील व्हिसा प्रक्रिया तातडीने रोखली असून, यामध्ये रशिया, अफगाणिस्तान आणि इराणसारख्या प्रमुख देशांचा समावेश आहे.अमेरिकेच्या तिजोरीवर आणि सार्वजनिक सुविधांवर भार ठरू शकणाऱ्या अर्जदारांना रोखणे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

स्टेट डिपार्टमेंटने एका निवेदनाद्वारे दूतावास अधिकाऱ्यांना विद्यमान कायद्यांतर्गत व्हिसा नाकारण्याचे निर्देश दिले आहेत. सध्या विभाग आपली स्क्रीनिंग (तपासणी) आणि सुरक्षा प्रक्रियांचे पुनर्मूल्यांकन करत आहे. या ७५ देशांच्या यादीत सोमालिया, रशिया, अफगाणिस्तान, ब्राझील, इराण, इराक, इजिप्त, नायजेरिया, थायलंड, येमेन आणि इतर देशांचा समावेश आहे. या देशांतील नागरिकांना आता अमेरिकेचा व्हिसा मिळवण्यात अडचणी येणार आहेत. ही बंदी २१ जानेवारीपासून लागू होणार असून, (पान ४ वर)

# बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांची गय नको

### महसूल व पोलीस प्रशासनाला कडक कारवाईचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** प्रवरा नदीपात्रातून सुरू असलेल्या बेकायदेशीर वाळू उपशाबाबत महसूल व पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी. संबंधित व्यक्ती किंवा कार्यकर्ता कोणाचाही असो, त्याला पाठीशी न घालता कायदेशीर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

लोणी येथे गुरुवारी आयोजित 'जनता दरबारा'त मंत्री डॉ. विखे पाटील यांनी राज्यभरातून व जिल्ह्यातून आलेल्या नागरिकांची निवेदने स्वीकारून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी सामाजिक व व्यक्तिगत स्वरूपातील निवेदने स्वीकारून संबंधित प्रश्नांचा निपटारा करण्याच्या, तसेच निर्धारित वेळेत कार्यवाही करण्याच्या सूचना उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. सध्या प्रवरा नदीपात्रातून दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी जनता दरबारात प्राप्त झाल्या. याची गंभीर दखल घेत पालकमंत्र्यांनी महसूल व पोलीस प्रशासनाची तातडीने बैठक घेतली. अधिकाऱ्यांनी कोणताही निष्काळजीपणा न करता कडक धोरण अवलंबवावे. (पान ४ वर)

■ शासकीय योजना व घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करून देताना कागदपत्रांची सखोल पडताळणी करूनच निर्णय घ्यावा, असेही त्यांनी सूचित केले. या बैठकीला संगमनेर, श्रीरामपूर व शिर्डी येथील प्रांताधिकारी, पोलीस उपअधीक्षक, तहसीलदार व मंडल अधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय

# शुद्ध पाण्याचे मृगजळ

तब्बल आठ वेळा देशातील सर्वांत स्वच्छ शहर ठरलेल्या इंदूरमध्ये पिण्याच्या दूषित पाण्यामुळे अनेक नागरिकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या चार महिन्यांपासून भगीरथपुरा या दाट लोकवस्तीच्या भागात नळाला दुर्गंधीयुक्त पाणी येत होते. रहिवाशांनी महापालिकेकडे वारंवार तक्रारी केल्या, मात्र प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. अखेर १० ते १४ जणांचा मृत्यू झाल्यानंतर प्रशासनाला जाग आली. सार्वजनिक शौचालयातून सांडपाणी पाण्याच्या पाइपलाईनमध्ये झिरपत होते, ही धक्कादायक बाब तपासातून समोर आली. विशेष म्हणजे, या पाइपलाईन बदलण्याची फाइल तब्बल चार महिने कार्यालयात प्रलंबित होती. याला काय म्हणणार?

लोक मोठ्या प्रमाणात आजारी पडल्यावर ३ ते ७ जानेवारीदरम्यान सुमारे ४० हजार नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यापैकी २,४५६ जणांना संसर्ग झाल्याचे आढळले, १६२ जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले आणि २६ जण अतिदक्षता विभागात होते. गॅस्ट्रोएन्टेरायटिस, टायफॉईड यांसारखे जलजन्य आजार पसरले. अव्यान साहू या सहा महिन्याच्या चिमुकल्या मुलाचाही जीव गेला. पालकांनी नळाच्या पाण्यात दूध मिसळून त्याला दिले होते. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण शहर हादरून गेले. इंदूर महापालिकेवर आणि राज्यात एकाच पक्षाचाच प्रभाव आहे. तरीही या राजकीय ताकदीचा नागरिकांना काहीच फायदा झाला नाही. तेथील महापौर पाणीपुरवठ्याबाबत मोठ्या घोषणा करत असले तरी वास्तव वेगळे आहे. देशातील या सर्वांत स्वच्छ शहरासाठी नर्मदेचे पाणी तब्बल ८० किलोमीटर अंतरावरून सुमारे १,८०० फूट उंचीवर पंप करून शहरात आणले जाते. यासाठी प्रतिलिटर २१ ते २५ रुपये खर्च येतो आणि दरमहा २५ ते ३० कोटी रुपये वीजबिल भरावे लागते. याचा वार्षिक खर्च सुमारे ३५० कोटी रुपये असूनही तब्बल ३५ ते ४० टक्के पाणी हे गळती किंवा चोरीमुळे वाया जाते. नियोजन आणि सुशासनाचा हा भक्कम पुरावा इंदूरवासियांच्याच नशिबी आला.

भगीरथपुरा परिसरात पाण्याची पाइपलाईन थेट शौचालयाखालून गेल्याने सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळले. वारंवार होणाऱ्या खोदकामामुळे परिस्थिती आणखी बिघडली. पूर्वी इंदूर पाण्याने समृद्ध शहर होते. दोन नद्या, पन्नासहून अधिक तलाव आणि शेकडो जलसाठे होते. शहरीकरणाच्या अतिरेकामुळे हे सर्व नष्ट झाले आणि शहर पूर्णतः नर्मदेवर अवलंबून राहिले. आजही आसपास अनेक नद्या उगम पावतात, तरी स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. २०१५ ते २०२१ दरम्यान पाणीपुरवठा सुधारण्यासाठी ६५० कोटी रुपये खर्च झाले. २०१७-१८ मध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळाने तपासलेल्या ६० पैकी ५९ नमुने अयोग्य ठरले होते आणि तरीही महापालिकेने योग्य कारवाई केली नाही. ऑगस्ट २०२५ मध्ये १,०७३ कोटी रुपयांचा नवीन कंत्राटही देण्यात आले होते. एवढा खर्च करूनही परिस्थिती का सुधारली नाही, हा नागरिकांचा प्रश्न आहे.

या घटनेनंतर कारवाई करत आहोत, हे दाखवण्यासाठी काही अधिकाऱ्यांचे बदली तसेच निलंबन भाग होते अणि तसेच झालेही. चौकशी समिती स्थापन झाली. मात्र सांडपाणी आणि पिण्याच्या पाण्याच्या लाईन्स वेगळ्या ठेवण्याचा मूलभूत नियम का पाळला गेला नाही, याचे समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. ते मिळणारही नाही. ही इंदूरपुरतीच ही समस्या मर्यादित नसून भोपाल, रतलाम, उज्जैन येथेही दूषित पाण्याच्या तक्रारी आहेत. स्वच्छ पाणी मिळणे हा विशेषाधिकार नसून मूलभूत मानवी हक्क आहे, हे प्रशासन विसरत असल्याची तीव्र जाणीव या घटनेने करून दिली आहे.

## शेवगावात मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** शेवगाव येथील नित्यसेवा हॉस्पिटल मध्ये इंडो-जर्मन फ्रेंडशिप अंतर्गत जर्मनी येथील तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन दि.१९ जानेवारी ते दि.२८ जानेवारी या कालावधीत करण्यात आले असून या शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन शिबीर संयोजक फादर प्रकाश राऊत यांनी केले आहे.

शेवगाव येथील नित्यसेवा हॉस्पिटलमध्ये सदर शिबिराची सुरुवात दि.१९ जानेवारी पासून होणार असून दि.२१ रोजी शिबीराचे उदघाटन होणार आहे. गरजू रुग्णांसाठी मोफत असलेल्या प्लास्टिक सर्जरी शिबीराचे नेतृत्व जर्मनी येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती डॉ.पेत्रा कार्कवील हया करीत आहे.

या शिबिरात जर्मनी येथील तज्ञ डॉक्टरांच्या समवेत इंदोर येथील डॉ.प्रकाश, छजलानी,डॉ.अमन, हैद्राबाद येथील डॉ.सूर्याकुमारी,लोणी येथील डॉ.अमोल आणि जर्मनीतील डॉक्टर हे बाल रुग्णांसह जळालेल्या, भाजलेल्या रूग्णांसह दुभंगलेले ओठ,त्वचेवरील ट्यूमर, नाकावरील बाहय विकृती यावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे

# विवेक कोल्हे हे कार्यकर्त्याला ताकद देणारे शक्तीकेंद्र : जितेंद्र रणशूर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** नगरपालिकेच्या इतिहासात सामाजिक समावेशकतेचा नवा अध्याय कोल्हे कुटुंबाच्या नेतृत्वाखाली लिहिला जात असून, हक्काचा नेता हा आपल्या हक्कासाठी ही केवळ घोषणा न राहता कृतीतून सिद्ध होत आहे, असे मत नवनियुक्त उपनगराध्यक्ष जितेंद्र चंद्रकांत रणशुर यांनी व्यक्त केले. सेवा हाच धर्म ही कोल्हे कुटुंबाने सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची घेतलेली भूमिका सर्व स्तरात कौतुकाचा विषय ठरत असल्याचे ते म्हणाले.

कोल्हे कुटुंबाच्या सर्वसमावेशक व न्याय्य कार्यपद्धतीबद्दल बोलताना रणशुर म्हणाले की, सहकार क्षेत्राच्या इतिहासात पहिल्यांदाच मागासवर्गीय समाजातील रमेशराव घोडेराव यांना कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमनपदी संधी देण्यात आली. विशेष म्हणजे त्यांना सह्यांचे अधिकार देण्यात आले असून, हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण आहे. हीच परंपरा पुढे नेत मला उपनगराध्यक्षपदाची



जबाबदारी देण्यात आली, याचा अभिमान वाटतो.

सहकार व नगरपालिका क्षेत्रात या पदांसाठी कोणतेही आरक्षण नसतानाही समाजातील कार्यकर्त्यांना संधी देणे, ही कोल्हे कुटुंबाची दूरदृष्टी दर्शवते. कोपरगाव नगरपालिकेच्या ७८ वर्षांच्या इतिहासात दलित समाजातील केवळ चार व्यक्तींना उच्च पदावर काम करण्याची संधी मिळाली असून, त्या सर्व संधी कोल्हे कुटुंबाच्या माध्यमातूनच मिळाल्या, हे वास्तव आहे. माजी मंत्री शंकरराव कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली १९८५ मध्ये बाळाभाऊ शिंदे उपनगराध्यक्ष, १९९८ मध्ये सिंधुताई कोपरे व प्रकाश शिंदे, तसेच २०११ मध्ये सुरेखाताई विनोद राक्षे नगराध्यक्षपदी विराजमान झाल्या होत्या.

५० दिवस चाललेल्या पालिका निवडणुकीत विवेक कोल्हे व संपूर्ण कोल्हे कुटुंबाने दिवसरात्र कार्यकर्त्यांची काळजी घेतली. ऊर्जा देणारे, अभ्यासू व दूरदृष्टी असलेले नेतृत्व म्हणून विवेक कोल्हे यांचा विशेष आदर वाटतो. त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मतदारसंघाचा विकासात्मक कायापालट निश्चित होईल, असा विश्वास रणशुर यांनी व्यक्त केला. या विजयासाठी प्रभागातील सर्व मतदार, भाजपचे कार्यकर्ते, आंबेडकरी चळवळीतील भीमसैनिक व मित्रपरिवाराचे रणशुर यांनी विशेष आभार मानले.

## पढेगाव कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी गणेश बंगाळ बिनविरोध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर:** तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या पढेगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी गणेश हरिभाऊ बंगाळ यांची बिनविरोध निवड झाली तर रिक्त जागेवर संचालक म्हणून भगवान तुळशीराम तोरणे यांची निवड करण्यात आली.

पढेगाव सोसायटीच्या दगडू बनकर सभागृहामध्ये संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आली होती या सभेसाठी अध्यासी अधिकारी म्हणून श्रीरामपूर येथील सहाय्यक निबंधक रवी



गडेकर,जगन्नाथ नरसाळे, कृष्णा शिंदे हे उपस्थित होते.

संस्थेचे चेअरमन महेश पंढरीनाथ बनकर यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने त्यांच्या जागी गणेश हरिभाऊ बंगाळ यांची निवड करण्यात आली.

यावेळी अशोक कारखान्याचे संचालक वाय. जी. बनकर, सेजल उद्योग समूहाचे संस्थापक जितेंद्र तोरणे ,संस्थेचे व्हाईस चेअरमन रणजित दिलीपराव बनकर, वसुंधरा पतसंस्थेच्या चेअरमन सुवर्णाताई बनकर, संचालक भाऊसाहेब ज्योतिबा कांदळकर, अशोक सखाहरी बनकर,विठ्ठल नानासाहेब बनकर,

यशवंत प्रल्हाद बनकर, संजीव देवराव येसेकर, अजय बाळासाहेब लिप्टे, महेश नामदेव काळे, भगवान तुळशीराम तोरणे, कमलबाई दिलीपराव बनकर, स्वाती यशवंत बनकर, प्रदिप राधाकृष्ण आहेर, राजेंद्र यादवराव तोरणे, चंद्रकांत भाऊसाहेब बनकर, भगवान गुलाब राऊत, मोहन प्रल्हाद येसेकर, निलेश कुंडलिक झावरे आदि संचालक उपस्थित होते. यावेळी जेष्ठ नेते अण्णासाहेब बनकर, दौलतराव बनकर, रामभाऊ लिपटे, भास्करराव लिपटे ,सुधाकर लिपटे, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय लिपटे, प्रशांत लिपटे, बबन लिपटे, राजेंद्र लिपटे, भाऊसाहेब बनकर आणि इतर उपस्थित होते. यावेळी अण्णासाहेब बनकर, भास्कर लिपटे, शिवाजीराव बंगाळ आदींची भाषणे झाली.

## पत्रकारांच्या सन्मानाने पत्रकार दिनाचा सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** राहता तालुक्यात पत्रकार दिनानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात पत्रकारांच्या कार्याला योग्य तो मान मिळाल्याने कार्यक्रमाला विशेष गौरव प्राप्त झाला. स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण व माहिती अधिकार संघटनेच्या वतीने आयोजित या उपक्रमात तालुक्यातील ज्येष्ठ व युवा पत्रकारांचा सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण संघटनेचे राहता तालुका कार्याध्यक्ष संपत डी. निर्मळ (आबा) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमाला जिल्हा सरचिटणीस तथा अनुपम सेल्स कारपोरेशनचे संचालक उमेश पन्हाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तालुका उपाध्यक्ष ज्ञानेश्वर साबळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले. यावेळी बोलताना संपत निर्मळ यांनी पत्रकारांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. समाजातील प्रत्येक घटनेचा वस्तुनिष्ठ व निर्भीड आरसा जनतेसमोर ठेवण्याचे पवित्र कार्य पत्रकार करतात. सण, सुट्टी, वैयक्तिक आयुष्य बाजूला ठेवून २४ तास समाजासाठी काम करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करणे ही केवळ औपचारिकता नसून कृतज्ञतेची भावना आहे.

या सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार शहाजी दिघे, महेश भोसले, शंकर सोनवणे, संदीप गावडे, तसेच पत्रकार कैलास वाघमारे, कैलास विखे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. याच वेळी सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर कलाकार, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद पंडित आणि कलाकार ज्ञानदेव शिंदे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.पत्रकारांच्या कार्याचा समाजावर होणारा सकारात्मक परिणाम आणि त्यांच्या योगदानाबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञता यामुळे हा सत्कार सोहळा कौतुकास्पद, प्रेरणादायी आणि स्मरणीय ठरला. उपस्थितांनी अशा उपक्रमांमुळे पत्रकारितेचा सन्मान अधिक दृढ होत असल्याची भावना व्यक्त केली.

## सफायर बिझनेस एक्सपोचा महाराष्ट्रात लौकिक : मालपाणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** ''विविध क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचा सहभाग उत्कृष्ट नियोजन आणि नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद यामुळे लायन्स सफायर च्या वतीने आयोजित करण्यात येणारा सफायर बिझनेस एक्सपो संपूर्ण राज्यात प्रचंड लोकप्रिय ठरला आहे. प्रत्येक वर्षी त्याची व्याप्ती वाढत चालली आहे. सलग अठरा वर्षे मिळविलेले हे यश खरोखर अभ्यासाचा विषय आहे'' असे प्रतिपादन नगरसेविका सौ. रचना मालपाणी यांनी येथे





केले.

१५ जानेवारी ते २१ जानेवारी असे सात दिवस मालपाणी लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या सफायर बिझनेस एक्सपोचे उद्घाटन सौ मालपाणी यांच्या हस्ते संपन्न झाले . तेव्हा झालेल्या उद्घाटन सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना त्यांनी वरील भावना बोलून दाखविल्या. यावेळी व्यासपीठावर, सौ नीलम खताळ, सफायरचे संस्थापक उद्योगपती गिरीश मालपाणी, प्रकल्प प्रमुख प्रफुल्ल खिवंसरा, श्रीनिवास भंडारी, अध्यक्ष कल्याण कासट, सेक्रेटरी सुमित मणियार, खजिनदार नामदेव मुळे, स्टॉल धारकांचे प्रतिनिधी डॉक्टर सुरेंद्र महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते. नगरसेविका सौ मालपाणी आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या की '' नाविन्याची परंपरा जपल्यामुळे सफायर बिझनेस एक्सपो १८ वर्षे होऊन देखील नवीन, ताजा आणि टवटवीत वाटतो. खरेदी, मनोरंजन आणि मेजवानी यांचा सुरेख त्रिवेणी संगम या ठिकाणी पाहायला मिळतो.

## ग्रामीण खेळाडू संधीचे सोने करतील : डॉ. शिरसाठ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** खेळाडूमध्ये शालेय जीवनात खेळाचे महत्व दिल्यास देशासाठी खेळणाऱ्या खेळाडूमध्ये ग्रामीण भागातील खेळाडूच देशाचं नाव उंचावतील हे मात्र नक्की असा विश्वास सिरसाठ यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील सिद्धनाथ वाडगाव येथील श्र ी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुलचा वार्षिक क्रीडा महोत्सव २०२५-२६ उत्साहात पार पडले दोन दिवस सुरु असलेल्या या क्रीडा महोस्तवात यावेळी१०० मी धावणे, २०० मी धावणे, लांब उडी, संगीत खुर्ची, लिंबू चमचा,पोत्यात पाय घालून पळणे, दोरी वरील उड्या, रिले. रस्सी खेच, गोळा फेक या क्रीडा प्रकारामध्ये विविध वयोगटाच्या स्पर्धा पार पडल्या शाळेचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब सिरसाठ यांच्या हस्ते शाळेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली यावेळी अग्नी हाऊस, पृथ्वी हाऊस, आकाश हाऊस, जल हाऊस या गटांच्या अंतर्गत स्पर्धा घेण्यात आल्या.

विद्यार्थ्यांनी प्रथम मशाल व नंतर संचलनाङ रे उपस्थित पाहुण्याना सलामी दिली.कार्यक्रमासाठी शाळेचे सचिव प्रमोद महाजन,वंदना चव्हाण, भाग्यश्र ी नरोडे, वंदना कैतके, सोनाली लबडे,शीतल नरोडे, किरण राजपूत,प्रियंका काळवणे,कोमल काकडे,वैष्णवी चव्हाण, सुरेखा हिवाळे,क्रीडा शिक्षक रविराज थोरात,समीर शेख, दत्तू काळवणे,योगेश देवबोने, शिवनाथ चव्हाण,गजानन राऊत आदी सह सर्वांनी परिश्र म घेतले

## सततच्या प्रयोगांनीच संशोधन होते : डॉ. मोहन रेड्डी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगांव :** तरूणांनी शिक्षण आणि उद्योग यांची सांगड घालत संशोधनाच्या दृष्टीने सततचे प्रयोग केले पाहीजे. शिक्षण , दीर्घ आयुष्य , आरोग्य सेवा, आपत्ती व्यवस्थापन, तंत्रज्ञान अशा अनेक विषयांवर संशोधन करणे गरजेचे आहे. सततच्या प्रयोगांनीच संशोधन होते. संशोधनाला बळकटी देण्यासाठी संजीवनी युनिर्व्हसिटीने उद्योगांशी समन्वय साधावा, असे प्रतिपादन हैद्राबाद स्थित सायंट या बहुराष्ट्रीय कंपनीचे संस्थापक अध्यक्ष व आयआयटी हैद्राबाद अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.व्ही. आर. मोहन रेड्डी यांनी केले.

संजीवनी युनिर्व्हसिटी आयोजीत 'सस्टेनेबल इनोव्हेशन इन इंजिनिअरींग, सायन्स अँड मॅनेजमेंट' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परीषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. बी.व्ही. आर. मोहन रेड्डी बोलत होते. संजीवनी युनिर्व्हसिटीचे प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे यांनी परीषदेचे अध्यक्षस्थान भुषविले. यावेळी सन्माननिय अतिथी म्हणुन संयुक्त संचालक-संशोधन संघटना, भारतीय





अमुर्त स्मरणिकेचे' प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.

विद्यापीठे, नवी दिल्लीचे डॉ. अमरेंद्र पाणी, टोकुशिमा युनिर्व्हसिटी जपानचे प्राद्यापक डॉ. पंकज कोईंकर, युनिर्व्हसिटी ऑफ ऑक्सफर्ड अँड कोर्स डायरेक्टर, इंग्लंडचे डॉ. अजित जावकर, युनिर्व्हसिटी ऑफ चेस्टर (युके)चे डीन डॉ. अलेक्स फेन्टॉन, सुजीवनी युनिर्व्हसिटीचे व्हाईस चांसलर डॉ. ए.जी.ठाकुर, डीन कविथा राणी, संशोधन संचालक डॉ. पी. विलिअम व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते 'अमुर्त स्मरणिकेचे' प्रकाशन झाले. या परीषदेमध्ये एकुण २५० रिसर्च पेपर्स सादर करण्यात आले होते. विविध ठिकाणचे प्राद्यापक व विद्यार्थ्यांची उपस्थिती उल्लेखनिय होती. प्रा. डॉ. सुंधाशु भट यांची सुत्रसंचालन केले तर प्रबंधक प्रा. अमोल ढाकणे यांनी आभार मानले.

## देवळाली प्रवरा नगर परिषदेकडून पत्रकार सन्मान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** देवळाली प्रवरा नगर परिषदेत पत्रकार दिनानिमित्त राहुरी तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा काल दिनांक १५ जानेवारी रोजी समर्थ बाबुराव पाटील महाराज सांस्कृतिक भवनात उत्साहात पार पडला कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन प्रकाश संसारे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार सुधाकर कराळे होते.

या कार्यक्रमात पत्रकार रफिक शेख, शिवाजी घाडगे यांनी आपले मनोगत व्यक्त करून येणाऱ्या पाच वर्षाच्या काळात सर्व पत्रकार बांधवांचे आपल्याला विकास कामासाठी व देवळाली नगर परिषदेच्या हितासाठी सर्वतोपरी सहकार्य राहणार असल्याचे सांगितले.

यावेळी व्यासपीठावर लोकनियुक्त नवनिर्वाचित नगराध्यक्ष सत्यजित कदम आणि उपनगराध्यक्षा बेबी बर्डे व कार्यालयीन अधिकारी रामदास म्हस्के यांचे प्रमुख उपस्थितीत पत्रकार सोहळा संपन्न झाला. यावेळी बोलताना नगराध्यक्ष सत्यजित कदम म्हणाले की पत्रकार बांधवांसाठी बऱ्याच दिवसापासून असलेली पत्रकार भवनाची मागणी लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू तसेच नागरिकांसाठी पायाभूत सुविधा नागरिक सुविधा स्वच्छता पाणीपुरवठा रस्ते व इतर मूलभूत प्रश्नांवर विशेष भर देण्यात येईल शहराचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्यासाठी प्रशासन लोकप्रतिनिधी व नागरिकांचा समन्वय साधने अत्यंत महत्त्वाचे आहे. या सर्व कामकाजासाठी आपल्या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभणे आवश्यक आहे. या कार्यक्रमासाठी नवनिर्वाचित नगरसेवक अमोल कदम, अजित चव्हाण, वसंत कदम, सौरभ मुसमाडे, बाळासाहेब लोखंडे, विरोधी पक्षनेते दासू पठारे, संतोष चोळके, शरद वाळूज, ऋषभ लोढा, सचिन शेटे, सुजाता कदम, सुवर्णा कोठुळे, चंदाराणी गाडे, सीमा देठे, पुष्पा तांबे, मनीषा कदम, अशोक चव्हाण, सतीश वाळुंज, सतीश कदम, शरद खांदे वैभव गाडे यांच्यासह राहुरी तालुक्यातील पत्रकार बांधव आणि अनेक मान्यवरांसह नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

# आश्वी खुर्दच्या पोस्ट ऑफिस विलीनीकरणाच्या स्थगितीसाठी पाठपुरावा करणार : ना. विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** ग्रामीण भागाचा आर्थिक कणा आणि गेल्या ४२ वर्षांपासून आश्वी खुर्दच्या जडणघडणीत महत्त्वाचे स्थान असलेल्या आश्वी खुर्द पोस्ट ऑफिसच्या विलीनीकरणाच्या हालचालींना राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी 'ब्रेक' लावला आहे. जरी सध्या हा निर्णय अधिकृतपणे स्थगित झालेला नसला, तरी तो थांबवण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया आणि पाठपुरावा करण्याच्या स्पष्ट सूचना नामदारांनी दिल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आश्वी खुर्द पोस्ट ऑफिस हे केवळ टपाल कार्यालय नसून हजारो खातेदारांचे विश्वासकेंद्र आहे. नफ्यात सुरू असलेल्या या कार्यालयाचा स्वतंत्र पिनकोड असून परिसरातील अनेक गावांचे दैनंदिन टपाल व आर्थिक व्यवहार याच ठिकाणी होतात. मात्र, अचानक हे पोस्ट ऑफिस आश्वी बुद्रुक पोस्ट



ऑफिसमध्ये विलीन करण्याच्या हालचाली सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली होती.

या गंभीर बाबीची माहिती मिळताच कारखान्याचे संचालक ॲड. अनिल भोसले, प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच सौ. अलकाताई बापुसाहेब गायकवाड, ना. विखे पाटील यांचे स्वीय सहाय्यक बापुसाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या

नामदारांच्या तत्पर भूमिकेमुळे विलीनीकरणाचा निर्णय जरी अद्याप अधिकृतपणे स्थगित झालेला नसला, तरी तो थांबवण्यासाठी ठोस हालचाली सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. केवळ आश्वासनांपुरते न थांबता, प्रत्यक्ष पत्रव्यवहार आणि प्रशासकीय पातळीवर हस्तक्षेप केल्याबद्दल ग्रामस्थांनी ना. विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

शिष्टमंडळाने थेट ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली.यावेळी प्रवरा फळे-भाजीपाला सोसायटीचे नूतन अध्यक्ष मकरंद गुणे, उपसरपंच बाबासाहेब भवर, ग्रामपंचायत सदस्य सोपान सोनवणे, माजी उपसरपंच संजय गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष भडकवाड, पुंजाआई वेलफेअर फाउंडेशनचे देवराम उर्फ कैलास गायकवाड, बाबासाहेब भोसले, भाजपा ड्रायव्हर सेलचे अनिल सोनवणे, जनसेवेचे दीपक सोनवणे, मनोज मेहरे, सुजित क्षिरसागर, आशिष

**जनतेच्या हिताशी तडजोड नाही :** ना. विखे

यावेळी बोलताना ना. विखे पाटील म्हणाले, जे पोस्ट ऑफिस नफ्यात आहे आणि ज्यावर हजारो लोकांचे दैनंदिन व्यवहार अवलंबून आहेत, अशी सेवा बंद करणे योग्य नाही. ग्रामीण भागाची ही जीवनवाहिनी आहे. आश्वी खुर्द पोस्ट ऑफिसचे अस्तित्व आणि स्वतंत्र पिनकोड टिकवण्यासाठी मी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार आहे.

गायकवाड आदी उपस्थित होते. ग्रामस्थांची भूमिका आणि पोस्ट ऑफिसची गरज लक्षात घेत ना. विखे पाटील यांनी कोणताही विलंब न करता डाक विभाग मुंबई पुणे व श्रीरामपूर येथील अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या, तसेच केंद्रीय दळणवळण मंत्र्यांकडेही सविस्तर माहिती पाठवून विलीनीकरणाचा निर्णय स्थगित करण्यासाठी प्राधान्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.

## रस्त्याचे काम राजकीय स्वार्थापोटी रखडवले : काकासाहेब जावळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी प्रतिनिधी :**

कोपरगाव तालुक्यातील सावळीविहीर-पोहेगाव-सोनेवाडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम ठेकेदार नितीन औताडे यांनी राजकीय स्वार्थापोटी रखडवले असल्याचा आरोप कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन काकासाहेब जावळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य मार्ग ६५ वरच्या या रस्त्यासाठी २.२८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून ८ ऑक्टोबर २०२४ रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली. मात्र कामाला अद्याप सुरुवात न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी उसळली आहे.

जावळे यांनी म्हटले की, अनेक विकासकामांसाठी आ. काळे यांनी कोट्यवधी निधी आणला असून बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. परंतु या रस्त्याचे काम ठेकेदार जाणीवपूर्वक थांबवत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी आ. काळे यांनी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे हा रस्ता मुद्दाम थांबवणाऱ्या नितीन औताडे यांच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी जावळे यांनी केली आहे.

त्यांनी पुढे असा आरोपही केला की, याआधी पोहेगाव श्री मयुरेश्वर मंदिरासाठी निधी मिळवताना ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र राजकीय द्वेषातून रोखण्यात आले. त्यामुळे नागरिकांच्या प्रश्नांपेक्षा राजकीय स्वार्थ प्राधान्याने ठेवला जात असल्याचे दिसते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# अकोले-संगमनेर-कोपरगाव रुग्णालयांचे १०० बेडमध्ये श्रेणीवर्धन : पालकमंत्री विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : जिल्ह्यातील अकोले, कोपरगाव आणि संगमनेर येथील ३० बेडच्या ग्रामीण रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करून ते १०० बेडमध्ये रूपांतर करण्यास राज्य सरकारने मान्यता दिल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर येथे १८ कोटी रूपयांच्या निधीतून कार्डियाक कॅथलॅबची सुरूवात झाली असून जिल्ह्यातील रुग्णांना त्याचा मोठा लाभ मिळत आहे. या लॅबमधून आतापर्यंत १३ रुग्णांची अँजिओग्राफी, तीन रुग्णांची अँजिओप्लास्टी तर ७७ रुग्णांची टू-डी इको चाचणी करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्हा रुग्णालयातील क्रिटिकल केअर युनिटचे काम ६० टक्के पूर्ण झाले असून गंभीर रुग्णांसाठी अहिल्यानगरमध्येच उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे. आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील २४,४६४ लाभार्थ्यांनी उपचार घेतले असून संबंधित रुग्णालयांना ६१ कोटी रूपयांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.



अकोले, संगमनेर आणि कोपरगाव येथील ग्रामीण रुग्णालयांचे १०० बेडमध्ये रूपांतर करण्याची मागणी मान्य झाल्याने आरोग्यसेवा मजबुत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील सर्व उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांसाठी औषधे व साहित्याकरता वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय गर्भलिंग निदान चाचण्यांवर कठोर लक्ष ठेवण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनास देण्यात आल्या असून जिल्हाधिकारी यांनी सातत्याने याबाबत आढावा घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात असे निर्देशही दिल्याचे त्यांनी सांगितले.

## रक्तदानाच्या माध्यमातून तरुणांनी समाजकार्यात सहभाग घ्यावा : डॉ.कदम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : रक्तदान हे श्रेष्ठ दान असून त्यामुळे गरजू रुग्णाचे प्राण वाचविले जाते. त्यामुळे तरुणांनी रक्तदान करून या सामाजिक कार्यात आपला सहभाग नोंदविणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी केले आहे.लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेत आयोजित लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त भव्य रक्तदान शिबिर कार्यक्रमात ते बोलते होते. डॉ.कदम बोलत होते. यावेळी पायरेन्स संस्थेचे संचालक डॉ.निलेश बनकर, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.दिलीप महाले, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बाळ जाधव,कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ काजल खंडागळे, बाभळेश्वर कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या डॉ.तनया कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी भारत वर्पे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.प्रवीण गायकर यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.रमेश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.संदीप पठारे, प्रा. प्रदीप मखरे आदींनी प्रयत्न केले.

## द•ख•ल

### डॉ. दिलीप शिरसाठ यांचा सत्कार



**श्रीरामपूर** : शहरातील अस्थिरोग तज्ञ डॉ. दिलीप भाऊसाहेब शिरसाठ यांची नगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा साई ग्रुपच्यावतीने माळी बोर्डींगचे विश्वस्त सुरेंद्र गिरमे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. शिरसाठ यांचे स्वीकृत नगरसेवकाच्या पदाच्या माध्यमातून शहराचा विकास होऊन प्रगती होवो, अशा शुभेच्छा यावेळी सुरेंद्र गिरमे यांनी दिल्या. याप्रसंगी सेवानिवृत्त प्राध्यापक हंबीरराव जहागिरदार उर्फ नाईक सर, माळी बोर्डींग वसतीगृहाचे अध्यक्ष दीपक गिरमे, अशोक साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष जालिंदर कुर्हे, जेष्ठ नागरीक आनंद मेळाव्याचे अध्यक्ष लक्ष्मणराव निकम, कृषीतज्ञ अशोकराव ससाणे, विलासराव घोगरे, बिल्डर असोसिएशनचे लक्ष्मणराव आगरकर, नगरालिकेचे सेवानिवृत्त कॅशिअर विलासराव कुदळे, पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख सेवानिवृत्त घोडेकर, सुरेश कुर्हे, समता परिषदेचे प्रकाश कुर्हे, आरोग्य मित्र सुभाषराव गायकवाड आदी उपस्थित होते.

### कोळपेवाडी केंद्रात गौतम पब्लिक स्कूल प्रथम



**कोळपेवाडी** : सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकिय चित्रकला परीक्षांचा निकाल नुकताच जाहिर झाला असुन या स्पर्धेत गौतम पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. इलेमेंटरी चित्रकला परीक्षेत शाळेतील एकूण ६९ विद्यार्थी व इंटरमीजीएट परीक्षेस १०० विदयार्थी प्रविष्ठ झाले होते. या परीक्षेत एकूण १६९ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे. शाळेचा इलेमेंटरी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून या परीक्षेत १९ विद्यार्थी 'अ' श्रेणीत तर २४ विद्यार्थी 'ब' श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहे.

इंटरमीजीएट परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून या परीक्षेत ४४ विद्यार्थी 'अ' श्रेणीत तर ३१ विद्यार्थी 'ब' श्रेणीत उत्तीर्ण झाले असल्याची माहिती शाळेचे प्राचार्य नूर शेख यांनी दिली आहे. शासकिय चित्रकला परीक्षेत कोळपेवाडी केंद्रातून व तालुक्यातून गौतम पब्लिक स्कूलने सर्व शाळांच्या तुलनेत सर्वो च्च निकालाची परंपरा राखलेली आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व कला शिक्षकाचे संस्थेचे चेअरमन मा.आ.अशोक काळे, व्हा.चेअरमन छबुराव आव्हाड, विश्वस्त आ.आशुतोष काळे, सचिव चैतालीताई काळे, संस्थेचे निरीक्षक नारायण बारे व सर्व संस्था सदस्य आदींनी अभिनंदन केले.

### जिल्हा बँकेच्या भोंगळ कारभारावर माळेवाडी ग्रामस्थ आक्रमक

**शिरसगाव** : जिल्हा बँकेच्या माळेवाडी शाखेत गेल्या आठवडाभरापासून ग्राहकांची मोठी गैरसोय सुरू असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागातील वीजपुरवठा सतत खंडित होत असल्याने वीज गेली की बँक तत्काळ बंद होते. बँकेतील इन्व्हर्टर सुविधा पूर्णपणे ठप्प असल्याने पासबुक, फिक्स पावत्या आणि संगणकीकरणाशी संबंधित व्यवहार थांबतात. परिणामी ग्राहकांना ताटकळत उभे राहावे लागत असून रोख रक्कम मिळण्यासही विलंब होतो. बँक कर्मचाऱ्यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी वरिष्ठ प्रशासनास दोन-तीन वेळा कळविले असल्याचे सांगितले.

तालुक्यातील नेते संचालक मंडळावर असतानाही ग्राहक आणि शेतकऱ्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याची ग्रामस्थांची खंत आहे. आजच्या बाजारदिनीही ग्राहकांची मोठी गर्दी असताना वीज नसल्यामुळे व्यवहार थांबले. त्वरित सुधारणा न झाल्यास आंदोलनाचा इशारा प्रतीक नेद्रे, महेश नेद्रे, भाऊसाहेब गागरे, सिकंदर शेख, कृष्णा ताके, संभाजी जाधव, भारत वानखेडे आणि गौरव महांकाळे यांनी दिला आहे.

## एआय तंत्रज्ञानाचा वापर समाजभिमुख करा : शालिनीताई विखे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन रौप्य करंडक वादविवाद स्पर्धे चे उद्घाटन गुरुवार दि.१५ रोजी महाविद्यालयात उत्साहात पार पडले. या स्पर्धेत राज्यातील विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वललाने करण्यात आली स्वागत व प्रमुख अतिथींचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे यांनी करून दिला.

प्रास्ताविक डॉ.शांताराम चौधरी यांनी केले त्यानंतर प्रमुख मान्यवरांचा व अतिथींचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. भास्कर शेळके म्हणाले, वादविवाद स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला, विश्लेषणात्मक दृष्टिकोनाला आणि वक्तृत्वकौशल्याला चालना मिळते, असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात बोलताना ,मा. जिल्हा परिषद अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे पाटील यांनी -ख चे फायदे व तोटे नमूद करताना -ख चा चांगला व समाजभिमुख कामासाठी वापर करावा ,असे सांगितले.

या कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.राम पवार यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.के खेमनर व डॉ एस. एम.वाकोळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.राम पवार,डॉ.शांताराम चौधरी ,डॉ.एम यु पाटील ,डॉ.व्ही ए खर्डे ,डॉ.बी के वाणी ,प्रा.व्ही ए खाडे ,डॉ.के. पी. पलघडमल यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण उद्या समारोपाच्या दिवशी होणार आहे.

## एकादशी निमित्ताने हजारो भाविकांनी घेतले पैस खांबाचे दर्शन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : षटतिला एकादशीच्या निमित्ताने तीर्थक्षेत्र नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरामध्ये मकरसंक्रांतीच्या दिवशी सुमारे एक लाख भाविकांनी माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या पैस खांबाचे दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी येथे ज्ञानोबा माऊली तुकारामअसा गजर करत हजेरी लावली होती. आलेल्या दिंडयांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी स्वागत केले.

माऊलींच्या षटतिला एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्षभर माऊलींच्या प्रांगणात रांगोळी काढणाऱ्या सेवेकरी सुरेखाताई वाघ व अभिजित वाघ या यजमानांच्या हस्ते माऊलींच्या पैस खांबास अभिषेक घालण्यात आला. षटतिला एकादशीला दूरवरून दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे संत ज्ञानेश्वर महाराज पैसखांब मंदिराच्या विश्वस्त मंडळींनी स्वागत केले.यावेळी खेड्यापाडयातून पायी आलेल्या व दिंडीतील चालकांचा संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख मार्गदर्शक वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के,विश्वस्त कृष्णा पिसोटे, कैलास जाधव यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.

एकादशीचे औचित्य साधून माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी, संत ज्ञानेश्वर माऊली पैस खांब, भगवान दत्तात्रय, करविरेश्वर, वैकुंठवाशी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर परिसर गर्दीने गजबजून गेला होता. (छाया- सुधीर चव्हाण नेवासा)

## पत्रकार सुरक्षेसाठी १५ लाखांचा विमा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : डॉर्फ केटल प्रा लि सप्रेम संस्था मुंबई यांच्या सहकार्याने व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या सर्व सदस्यांना भारतीय डाक विभागाच्या वतीने १५ लाख रुपयांच्या अपघाती विम्याचे वितरण करण्यात आले. पत्रकारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राबवण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरत असून सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे. व्हॉईस ऑफ मीडिया संगमनेर शाखेच्या वतीने सर्व सदस्यांसाठी हा महत्त्वपूर्ण व आरोग्यदायी उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आला. पत्रकारांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या भवितव्याची जबाबदारी घेणारा हा उपक्रम संघटनेच्या सामाजिक जाणिवेचे दर्शन घडवणारा ठरला आहे.हा उपक्रम व्हॉईस ऑफमीडिया चे प्रदेश कार्यकारिणी समनव्यक गोरक्षनाथ मदने, राज्यविंग प्रमुख अमोल मतकर, जिल्हाध्यक्ष बाळा साहेब गडाख, महिला जिल्हाध्यक्षा वैशाली कुलकर्णी, जिल्हा कार्याध्यक्ष गोरक्ष नेहे, जिल्हा सचिव नवनाथ वावरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका ध्यक्ष बाबासाहेब कडू, शहराध्यक्ष महेश पगारे, सचिव सचिन जंत्रे तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला आहे. या वेळी एस.बी.आय. लाईफ इन्शुरन्स कंपनीच्या वतीने कांदळकर यांनी उपस्थित सदस्यांना विमा, विविध विमा योजना तसेच गुंतवणूक विषयक सविस्तर माहिती दिली. आर्थिक नियोजन आणि सुरक्षितते च्या दृष्टीने हे मार्गदर्शन सदस्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सचिव नवनाथ वावरे यांनी केले, प्रास्ताविक शहरा ध्यक्ष महेश पगारे यांनी केले तर आभार जिल्हा कार्याध्यक्ष गोरक्ष नेहे यांनी मानले.

## युवकांना घडवण्यासाठी सकारात्मक विचार हाच एकमेव मार्ग : डॉ. सोपान शिंगोटे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : युवकांनी जीवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी वाचनसंस्कृतीची जोपासना करत योगाभ्यास आणि सकारात्मक विचारांची कास धरली पाहिजे, असे प्रतिपादन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ येथील प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळाच्या सहकार्याने आयोजित तीन दिवसीय 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला' नुकतीच उत्साहात पार पडली, त्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. मुकुंद रामराव जयकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबतच जीवनकौशल्ये, आरोग्यविषयक जाणीव आणि राष्ट्रनिर्मितीची मूल्ये यांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

तीन दिवस चाललेल्या या उपक्रमात विविध विषयांवरील नामवंत वक्त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सोपान शिंगोटे यांनी वाचन, योग आणि सकारात्मक विचारसरणीचा समतोल साधणारा युवकच सक्षम नागरिक बनतो, असे नमूद केले. माहितीपूर्ण व सामाजिकदृष्ट्या सजग विद्यार्थी घडवणे हेच शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी उपप्राचार्य डॉ. जे. आर. सिनगार, डॉ. आर. एस. तांबे, प्रा. डी. एन. घाणे, डॉ. गंगाराम वडीतके, डॉ. सुष्मिता उंडे, डॉ. व्ही. जी. शिंदे यांच्यासह प्राध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यार्थी वाढदिवसानिमित्त निमगाव शाळेस भेटवस्तू व मिष्टान्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील निमगाव खैरी येथील जि.प.प्रा.शाळेत 'माझा वाढदिवस-माझी समृद्ध शाळा' या उपक्रमांतर्गत तिसरीत शिकणाऱ्या अंकिता दत्तू बत्तीसे हिने अनोख्या पद्धतीने आपला वाढदिवस साजरा केला.



अनावश्यक खर्च टाळत तिने शाळेसाठी धान्य कोठ्या, झाडू व स्वच्छतेचे साहित्य भेट वस्तूंच्या स्वरूपात दिला. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीदिनी झालेल्या या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच अंगणवाडीतील बालकांना लापशी, व्हेज पुलाव व जिलेबीचे मिष्टान्न भोजन देण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शाळाप्रेम, सामाजिकता व दानशूर वृत्ती विकसित करण्यासाठी राबविण्यात येत असून त्यास पालक व ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश तरस, महेंद्र साबळे, मुख्याध्यापक संतोष वाघमोडे, प्रतिभा तोरणे, मीना निकम, सुधा गमे, अंगणवाडी सेविका अनिता काजळे, अर्चना पंडित, बेबीताई ढोबळे, आरती सोनवणे, राधाबाई निमसे, अनिता निमसे तसेच अंकिताची आई ललिता बत्तीसे व आजोबा पुंजाराम बत्तीसे उपस्थित होते. या उपक्रमाचे गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे, शिक्षण विस्ताराधिकारी दीपक त्रिभुवन, केंद्रप्रमुख बाबासाहेब पिलगर, सरपंच दत्तात्रय झुराळे, उपसरपंच विजयसिंग परदेशी आणि पत्रकार साईनाथ बनकर यांनी कौतुक व अभिनंदन केले.

## जिल्हास्तरीय गणितविज्ञान प्रदर्शनात रवींद्र वर्पे यांचे उपकरणास द्वितीय क्रमांक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : जामखेड येथे पार पडलेल्या जिल्हा स्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनात शिक्षक गटात सायखिंडी येथील श्री मनोहरबाबा विद्यालयाचे शिक्षक रवींद्र वर्पे यांच्या उपकरणास द्वितीय क्रमांक मिळाला आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आली यावेळी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड (प्राथमिक) भास्कर पाटील उपस्थित होते. जिल्हास्तरीय गणित विज्ञान प्रदर्शनात मनोहर बाबा विद्यालयाचे शिक्षक रविंद्र चंद्रकांत वर्पे यांनी सादर केलेल्या बहुपयोगी शैक्षणिक साहित्य या नाविन्यपूर्ण उपकरणास द्वितीय क्रमांक मिळाला.विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला अधिक प्रभावी, सुलभ व उपयुक्त ठरणारे हे साहित्य शिक्षण क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली संगमनेर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड विस्तार अधिकारी. कल्याण राऊत तसेच केंद्रप्रमुख कल्पना बिडवे यांचे मार्गदर्शन लाभले.वर्पे यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## माऊली प्रतिष्ठानने शिक्षणासोबत सामाजिक दायित्व जपले : आ. हेमंत ओगले



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : शिक्षणासोबतच समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून माऊली प्रतिष्ठानने आपले सामाजिक दायित्व प्रभावीपणे जपले असल्याचे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले.

माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर मुरकुटे व डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली वांगी-भेर्डापूर येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व कृतज्ञता पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते माजी आ. भानुदास मुरकुटे होते. यावेळी नूतन नगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हा काँग्रेसध्यक्ष सचिन गुजर, उपजिल्हाधिकारी दत्तात्रय बोरुडे, अच्युत बडाख, बाबुराव बडाख, शांताराम तूवर, भरत साळुंके, विराज भोसले, नितीन भागडे, अर्जुन राऊत, योगेश उंडे उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पुढील मान्यवरांना कृतज्ञता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. युवा भूषण पुरस्कार ड. शुभम फरगडे (मोडी लिपी तज्ज्ञ) ,जीवनगौरव पुरस्कार चंदर बापू दासरजोगी (पाटील, वैदू समाज - निपाणी) ,प्रगतशील शेतकरी म्हणून बापूसाहेब उंडे (मातापुर), सामाजिक कार्यासाठी सौ. हरणाबाई गो. चव्हाण (वारकरी - कारेगाव), अध्यात्मिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सौ. भगीरथीबाई की. गायधने (निपाणी वडगाव) तसेच समाजभूषण पुरस्काराने बाळासाहेब गायकवाड (वडाळा महादेव) यांचा सन्मान करण्यात आला. तसेच यावर्षीचे उत्कृष्ट विद्यार्थी व पालक यांनाही मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. आ. हेमंत ओगले म्हणाले की, आपल्या कार्यातून समाजासाठी आदर्श निर्माण करणाऱ्या या सर्व व्यक्ती प्रेरणादायी असून सामाजिक, शैक्षणिक, कृषी, आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल. माजी आमदार भानुदास मुरकुटे, नगराध्यक्ष करण ससाणे, सचिन गुजर व उपजिल्हाधिकारी दत्तात्रय बोरुडे यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून अशा कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान केल्याने समाजात सकारात्मक संदेश जात असून सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमास संजय कवडे, योगेश बडधे, पवन पाऊलबुधे, जालिंदर दाणे, सुनील भराडी, प्रकाश जाधव, शामसुंदर बडाख , गोरख तारडे तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

### सलग तीन वस्त्यांवर दरोडा

वास्तव्यास आहेत. रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास दरोडेखोरांनी अप्पासाहेब कचरू खिळे यांच्या घरात प्रवेश केला. त्यांच्या गळ्याला धारदार चाकू लावून मारहाण करत मोबाईल फोडण्यात आला. घरातील कपाटातून रोख रक्कम तसेच सोने-चांदीचे दागिने लंपास करून दरोडेखोरांनी कुटुंबीयांना घरात कोंडून ठेवले.

यानंतर आरडाओरड होताच दरोडेखोरांनी शेजारीच सुमारे २०० फूट अंतरावर राहणारे वडील कचरू श्रीपती खिळे यांच्या घराकडे मोर्चा वळवला. घराबाहेर झोपलेल्या कचरू खिळे यांना मारहाण करून दरवाजे तोडून घरात प्रवेश केला. मुलगा परमेश्वर व मोहन यांच्या गळ्याला चाकू लावून खिळे कुटुंबाला महिलांना जबर मारहाण करण्यात आली. घरातील दोन कपाटे फोडून त्यातील मौल्यवान सोने-चांदीच्या वस्तू, महिलांच्या अंगावरील दागिने व लाखो रुपयांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली. या मारहाणीत सविता खिळे यांच्या कानातील झुंबर ओढून घेतल्याने त्यांचा कान फाटला असून लहान मुलांनाही मारहाण करण्यात आल्याची माहिती आहे.

यानंतर दरोडेखोरांनी पांडुरंग वैद्य यांच्या घरावर हल्ला चढवला. दरवाजा तोडून घरात प्रवेश करत पांडुरंग वैद्य व त्यांची पत्नी रुक्मिणी यांना जबर मारहाण करून रोख रक्कम व सोने-चांदीचे दागिने लंपास केले. मदतीसाठी आरडाओरड करत असताना शेजारील नागरिक भीमराव अकोलकर धावून आले असता दरोडेखोरांनी त्यांच्यावर दगडफेक केली, यात ते गंभीर जखमी झाले. पांडुरंग वैद्य यांच्यावर अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यानंतर दरोडेखोरांनी अंकुश शांतवन खंडागळे यांच्या घरातही प्रवेश करून रोख रक्कम लंपास केली.

### बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांची गय नको

तत्त्वाशी विसंगत असल्याचे त्यांनी नमूद केले. भाजपा आणि मराठी माणूस या दोन वेगळ्या गोष्टी नाहीत, असे स्पष्ट करताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, मराठी माणसाने स्थापन केलेल्या मातृसंस्थेची विचारधारा हीच भाजपाची विचारधारा आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि बाळासाहेब ठाकरे या तीनही मराठी भाषिक थोर व्यक्तींच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन देश आणि समाज घडवण्याचे कार्य भाजपा वर्षानुवर्षे करत आहे.

ज्या भागातून वाळू उपसा होत असेल, त्याची जबाबदारी संबंधित गावातील तलाठी व मंडल अधिकारी यांच्यावर निश्चित करून वेळप्रसंगी त्यांच्यावरही कारवाई करावी. तसेच प्रशासनाच्या नावाखाली अशा बेकायदेशीर कृत्याला सहकार्य करणाऱ्या व्यक्तींची गय करू नका, असे निर्देशही डॉ. विखे पाटील यांनी दिले. आचारसंहिता शिथिल झाल्याने शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी संवेदनशीलतेने कार्यवाही करावी. प्रलंबित विकासात्मक कामांना प्राधान्य देऊन ती तातडीने मार्गी लावावीत, असे आवाहन पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी केले.

### महायुतीचाच बोलबाला!

या ठिकाणी ७२ जागा शिवसेनेला मिळत आहेत. तर भिवंडीत त्रिशंकु अवस्था आहे. य ठिकाणी काँग्रेस २५ भाजप २१ केडीएमसी मध्ये शिवसेनेला ५७ जागा मिळताना दिसत आहेत. मीरा भाईंदरमध्येही भाजपला यश मिळत असून या ठिकाणी ४४ जागा मिळत आहेत. तर शिवसेनाला या ठिकाणी ३९ जागा मिळणार आहेत. वसई विरारमध्ये बविआ ७२ जागांसह सत्तेत दिसत आहे, तर उल्हासनगरमध्ये शिवसेनेला २९ आणि भाजपला २८ जागा मिळतील. पुण्यात भाजपला ७० जागा मिळताना दिसत असून भाजपच सर्वात मोठा पक्ष ठरत आहे. खरंतर या ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादीने निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. याचबरोबर पुण्यात शिवसेनेला १२ जागा मिळताना दिसत आहेत. तर पिंपरी चिंचवडमध्येही भाजप सत्तेत दिसत असून या ठिकाणी देखील भाजपला ७० जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४२ जागा मिळताना दिसत आहेत. एक्झिट पोल हे फक्त अंदाज असून, अंतिम निकाल उद्या मतमोजणीनंतरच निश्चित होईल. मतदारांच्या कौलाने राज्यातील राजकीय समीकरणे कशी बदलतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उद्या सकाळी १० वाजेपासून मतमोजणी सुरू होईल. पिंपरी-चिंचवडमध्ये खरी चुरस पिंपरी-चिंचवडमध्ये (१५१ जागा) भाजपाची सत्ता कायम राहण्याचा कल दिसत आहे. भाजप : २४ ते ५१ जागा (काही पोलमध्ये अजित पवार गट आघाडीवर) राष्ट्रवादी (अजित पवार गट): ५१ जागा (प्राब एक्झिट पोल) शिवसेना (शिंदे): ९ जागा काका-पुतण्याच्या युतीचा प्रभाव दिसत असला तरी, भाजप सत्ताधारी राहण्याची शक्यता जास्त आहे.

### प्रतिकूल स्थितीतही देशात ५१ अब्ज डॉलर विदेशी गुंतवणूक

उत्पादनांवरही भर दिला जात आहे, असे भाटिया यांनी स्पष्ट केले. जागतिक बँकेकडून कौतुक जागतिक बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी (२०२५-२६) भारताच्या 'जीडीपी'वाढीचा अंदाज ७.२ टक्के इतका वर्तवला आहे. जून महिन्यातील अंदाजाच्या तुलनेत यात ०.९ टक्क्याने वाढ करण्यात आली असून, देशांतर्गत मागणी आणि कर सुधारणा ही या वाढीमागील मुख्य कारणे असल्याचे बँकेने म्हटले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची आशादायक वाटचाल हेही विदेशी गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढल्याचे प्रतीक मानले जात आहे. तसेच, 'ट्रम्प टॅरिफ'नंतरही भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल वेगाने सुरू असल्यामुळे विदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढत चालल्याचे दिसत आहे.

### अमेरिकेकडून रशिया, इराण आणि अफगाणिस्तानसह......

व्हिसा प्रक्रियेचे पुनर्मूल्यांकन पूर्ण होईपर्यंत ती अनिश्चित काळासाठी सुरू राहील. विशेष म्हणजे, मिनेसोटा येथील एका मोठ्या आर्थिक घोटाळ्यानंतर सोमालिया अमेरिकन प्रशासनाच्या रडारवर आले आहे. या घोटाळ्यात अनेक सोमाली नागरिक आणि सोमाली-अमेरिकन लोकांचा सहभाग असल्याचे समोर आले होते.

नोव्हेंबर २०२५ मध्येच अमेरिकन परराष्ट्र विभागाने जगभरातील आपल्या दूतावासांना 'सार्वजनिक भार' या तरतुदींतर्गत कडक स्क्रीनिंग करण्याचे आदेश दिले होते. नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जे अर्जदार भविष्यात अमेरिकेच्या सरकारी लाभांवर किंवा मदतीवर अवलंबून राहण्याची शक्यता आहे, त्यांना व्हिसा नाकारला जाईल. यासाठी अर्जदाराचे आरोग्य, वय, इंग्रजी भाषेतील नैपुण्य, आर्थिक स्थिती आणि दीर्घकालीन वैद्यकीय उपचारांची गरज यांसारख्या निकषांची तपासणी केली जाणार आहे. दरम्यान, अमेरिकन परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी स्पष्ट केले की, जे संभाव्य स्थलांतरित अमेरिकेवर आर्थिक भार बनतील आणि येथील जनतेच्या उदारतेचा गैरफायदा घेतील, त्यांना अपात्र ठरवण्यासाठी विभाग आपल्या दीर्घकालीन अधिकारांचा वापर करत आहे.

# नेवासा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षपदी आपच्या शालिनी सुखदान यांची निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नगरपंचायतच्या उपनगराध्यक्ष पदाच्या मकरसंक्रांतीच्या दिवशी झालेल्या निवडणूकीत क्रांतिकारी शेतकरी पक्ष पुरस्कृत आम आदमी पार्टीच्या नगरसेविका सौ.शालिनीताई सुखदान तर स्वीकृत नगरसेवक म्हणून क्रांतिकारीचे राजू काळे तर भाजपच्या वैद्यकीय आघाडीच्या राज्य उपाध्यक्ष डॉ.मनिषाताई वाघ यांची निवड करण्यात आली आहे

नेवासा नगरपंचायतमध्ये माजी मंत्री शंकरराव गडाख गटाचे नगरसेवक पदाचे बहुमत असून त्यांचे आम आदमीसह दहा सदस्य निवडून आलेले आहेत तर विरोधी गटाचे अपक्षासह ७ नगरसेवक असून बुधवार दि.१४ जानेवारी रोजी नेवासा नगरपंचायतची उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक प्रकिया पार पाडली



यामध्ये क्रांतीकारी शेतकरी पक्ष व आम आदमी पक्षाच्या उमेदवार शालिनीताई संजय सुखधान व भाजप सेना प्रणित विरोधी उमेदवार प्रवीण सरोदे यांच्यात निवडणूक होऊन सुखधान यांना १० तर प्रवीण सरोदे यांना ८ जणांनी हात उंचावुन मतदान प्रक्रिया पार पाडली.

झालेल्या निवड प्रक्रियेच्या प्रसंगी भाजप शिवसेना महायुतीचे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी पिठासन अधिकारी म्हणून काम पाहिले यावेळी मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी निवड प्रक्रियेच्या कामी साहाय्य केले. क्रांतिकारी शेतकरी पक्ष पुरस्कृत आम आदमी पार्टीच्या शालिनीताई संजय सुखदान यांची उपनगराध्यक्षपदी तर क्रांतिकारी शेतकरी पक्षाचे राजेंद्र कारभारी काळे व भाजपच्या डॉ.मनिषाताई वाघ यांची स्वीकृत नगर सेवकपदी निवड करण्यात आली.

क्रांतिकारी पक्षाचे ९ सदस्य असताना देखील त्यांनी आम आदमी पक्षाच्या नगरसेविका शालिनीताई सुखधान यांना उपनगराध्यक्ष पदाची संधी दिली त्यांच्या क्रांतिकारी निर्णयाचे स्वागत केले जात आहे. झालेल्या निवड प्रसंगी माजी मंत्री गडाख यांनी क्रांतिकारी निर्णय घेत एका महिलेला उपनगराध्यक्ष होण्याची संधी दिली. यावेळी अँड. संजय सुखदान म्हणाले की नगरपंचायत अधिनियमात स्पष्टपणे बोट वर करून मतदान असा नियम असताना सत्तेचा गैर वापर करण्याचे षडयंत्र रचविले होते. त्याला अधिकाऱ्यांची साथ मिळत होती परंतु अगदी जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत आम्हाला जावे लागले.जिल्हाधिकारी साहेबांनी आम्हाला न्याय दिला. माजी मंत्री गडाख यांनी दिलेला शब्द पाळून सामान्य महिलेला उपनगराध्यक्ष केले आता सामान्य नेवासकर जनतेसाठी काम केले जाइल असे आप चे नेते संजय सुखधान यांनी सांगितले.

## निधन वार्ता

### निवृत्ती झावरे



**ताहाराबाद :** राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथील ह.भ.प.निवृत्ती गणपत झावरे (वय-९४) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, भाऊ, पुतणे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. इंद्रभान व नामदेव झावरे यांचे ते वडील होत.

### रमेशलाल शिंगवी



**श्रीरामपूर, :** शहरातील जैन समाजातील कार्यकर्ते रमेशलाल मोहनलाल शिंगवी (वय ७१) यांचे बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ भाऊ, २ मुले, १ मुलगी, सुना, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते बाबुलाल शिंगवी यांचे धाकटे बंधु, उमेश व मनोज शिंगवी यांचे वडील तसेच अशोक कर्नावट यांचे ते मेहुणे होत.

# कोकणगावात शेतकरी प्रशिक्षण व कृषी निविष्ठा वाटप कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील यांचे नियोजनाखाली उद्यानविद्या विभागअंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित भाजीपाला संशोधन प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण व निविष्ठा वाटप कार्यक्रम कोकणगाव ता. संगमनेर येथील कृषी विभागाच्या बीजगुणन केंद्रामध्ये संपन्न झाला. यावेळी डॉ. शर्मिला शिंदे, डॉ. शालिग्राम गांगुर्डे संगमनेर येथील बीजगुण केंद्राचे उप




कृषी अधिकारी टी.व्ही. सूर्यवंशी, मंडल कृषी अधिकारी विक्रम भवारी व कृषी सहाय्यक श्रीपत तरटे उपस्थित होते.

यावेळी झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये डॉ. शर्मिला शिंदे यांनी भाजीपाला पिकांचे दैनंदिन आहारातील महत्त्व,सेंद्रिय भाजीपाला लागवड, माती परीक्षणाचे महत्व, जैविक संवर्धन खतांचा उपयोग, डॉ. शालिग्राम गांगुर्डे यांनी भाजीपाला पिकांवरील किडींचे एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी शेतकऱ्यांना किट म्हणून भेंडी तोडणी यंत्र, सायकल कोळपे, खुरपी, शेवगा, शेंगा काढणी यंत्र, पिवळे चिकट सापळे व मका सोलनि यंत्र या कृषी निविष्ठांचे वितरण करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संगमनेर येथील उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. शर्मिला शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिंदोडी, पिंपरने,तळेगाव, कोकणगाव तसेच परिसरातील ५० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

### आणखी किती योजना सरपंचाच्या सहीशिवाय झाल्या? सखोल चौकशी करा : सुनील पटारे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान (ता. श्रीरामपूर):** कारेगाव ग्रामपंचायतीत सुमारे ४० लाख रुपयांचे घनकचरा व्यवस्थापनाचे काम सरपंचाच्या कोणत्याही सहीशिवाय मंजूर करून प्रत्यक्षात सुरू करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य सुनील पटारे यांनी केली आहे.

या प्रकरणाची दखल घेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांकडून तात्काळ सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. चौकशी सुरू असतानाच कारेगाव येथील ग्रामविकास अधिकारी यांनी आठ दिवसांची रजा घेतली, मात्र रजा संपल्यानंतरही ते हजर न राहिल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

याबाबत पंचायत समितीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांनी बदलीसाठी अर्ज केला असल्याचे सांगण्यात आले. तसेच कारेगाव ग्रामपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार दुसऱ्या ग्रामविकास अधिकाऱ्याकडे देण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# डॉ. आसावा यांचा जागतिक गौरव राज्यपालांच्या हस्ते समाज गौरव उपाधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** चणेगाव येथील प्रगतशील शेतकरी डॉ. विठ्ठलदास बालकिसन आसावा यांनी कृषी, पर्यावरण संवर्धन, ग्रामीण विकास व सामाजिक उपक्रमांत उल्लेखनीय कार्य करून राज्यभर आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत जोधपूर येथे झालेल्या अखिल भारतवर्षीय माहेश्वरी महासभा आयोजित आंतरराष्ट्रीय महाअधिवेशनातील समाज अलंकरण समारोहात राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते त्यांना 'समाज गौरव' उपाधी देण्यात आली.

या महाअधिवेशनास अमेरिका, रशिया, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, चीनसह २४ देश आणि भारतातील



४३० प्रांतातील ५० हजारांहून अधिक समाजबांधव उपस्थित होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राजस्थान मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, केंद्रीय मंत्री जेंद्रसिंह शेखावत यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिवेशनाचे उद्घाटन झाले.

डॉ. आसावा यांच्या नावावर असलेली उपलब्धी उल्लेखनीय आहेत. २७ एकर शेतीत जैविक व रासायनिक संतुलन तंत्रज्ञान, वर्मी-कम्पोस्ट, वनस्पतीजन्य अर्क, जलसंधारण, ऊस बेणे प्रक्रिया, खुला गोठा, प्रकाश सापळा अशा स्व-विकसित तंत्रज्ञानाचा अवलंब त्यांनी केला. शेतात काडेपेटी न वापरण्याचा संकल्प उपक्रमामुळे हजारो शेतकऱ्यांनी पाचट जाळणे थांबवून पर्यावरणपूरक शेतीकडे वाटचाल केली. राज्य शासनाचा वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार (२००६), शेतकरी गौरव पुरस्कार (२०११) तसेच राज्याचा पहिला परदेशी कृषी अध्ययन दौरा (चीन-२०१२) यासाठी निवड, हे त्यांचे महत्त्वपूर्ण मानचिन्हे आहेत. अलीकडेच अमेरिकन मेरीट कौन्सिल, न्यू जर्सी यांनी कृषी व पर्यावरण विषयातील मानद डॉक्टरेट बहाल केली.

डॉ. आसावा यांची आगामी दृष्टी 'विषमुक्त अन्न उत्पादन, जल साक्षरता, पर्यावरण संरक्षण व ग्रामविकास' अशी असून त्यांच्या कार्याबद्दल सर्वत्र अभिनंदन व्यक्त केले जात आहे.


## Change of Name

I, Shaikh Sameena Munir, resident of Rahuri, District Ahilyanagar 413705, hereby declare that I have changed my name to Samina Samir Shaikh. Hereafter, I shall be known as Samina Samir Shaikh for all purposes.


# भगवंताच्या नामस्मरणाने दु:खाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करा : उद्धव महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** मकरसंक्रांतीच्या दिवशी आलेल्या षटतिला एकादशी निमित्त नेवासा बुद्रुक शिवारात सुरेगाव रस्त्यावर असलेल्या श्री सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमात आयोजित किर्तन सोहळयाला भाविकांची मांदियाळी जमली होती.भगवंताच्या नामस्मरणाने व भक्तीने दु:खाची त्रिवता कमी करण्याचा प्रयत्न करा असा संदेश महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक यांनी यावेळी झालेल्या किर्तन सोहळ्यात बोलतांना केला.

यावेळी बोलतांना हभप उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर म्हणाले की जीवात्मा हा आनंद स्वरूप आहे,
कारण परमात्मा हा जीवात्मा स्वरूप असतो,संतांना आनंदाचा विषयच परमार्थ असल्याने भक्ती व प्रेमाला देव भुलतो,भगवंताच्या नामस्मरणापुढे काळाचे ही काही चालत नाही,देव भेट होणे हा पर्वकाळ आहे तसेच मकरसंक्रांत हा देखील पर्वकाळच आहे असल्याने सत्संग हा सतत होण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

सण उत्सव हे आपल्याला आनंद देतात म्हणून हे सण उत्सव एक पर्वकाळ आहे,पर्वकाळ हा साधता पाहिजे,गावागावात होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहातील सेवेची संधी साधता आली पाहिजे,देव पैशाने जोडला जात नाही त्यासाठी अंत:करणात भक्तीभाव निर्माण करा,संसाराला परमार्थाशी जोडण्याचा प्रयत्न करा,परमार्थाच्या माध्यमातून अंत:करणातील मलिनता दूर करून समाजातील भेद वाद नष्ट करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन महंत उद्धव महाराज यांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी हनुमान कथाकार हभप अंकुश महाराज जगताप,अशोक महाराज निरफळ,बाबासाहेब महाराज सातपुते उपस्थित होते. पत्रकार दिन झाल्याने जेष्ठ पत्रकार विनायक दरंदले, बाळासाहेब देवखिळे, सुधीर चव्हाण यांचा तर आश्रमाला भजनी मंडळाचे साहित्य दिल्याबद्दल सोनई येथील उद्योजक प्रकाश शेटे यांच्यासह अन्नदान करणाऱ्या दात्यांचा व उपस्थित मान्यवरांचा उद्धव महाराज यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान



करण्यात आला. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना खेडले परमानंद येथील सेवेकरी राजळे परिवाराच्या वतीने एकादशीचा फराळ प्रसाद देण्यात आला.मकरसंक्रांत सणाच्या निमित्ताने हजारो भाविकांनी महंत उद्धव महाराज मंडलिक यांचे संतपूजनडरे तिळगुळ घेऊन दर्शन घेतले.

# निवडणूक कार्यक्रम जाहीर; गंगापूर तालुक्यात आचारसंहिता लागू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार गंगापूर तालुक्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारांना नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी १६ ते २१ जानेवारी २०२६ हा कालावधी देण्यात आला असून नामनिर्देशन पत्रांची छाननी २२ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे उमेदवारी माघार घेण्याची अंतिम मुदत २७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. याच दिवशी दुपारी ३:३० नंतर निवडणूक चिन्हांचे वाटप व अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

नामनिर्देशन स्वीकारण्या पासुन चिन्ह वाटप पर्यंतची प्रक्रिया गंगापूर तहसिल कार्यालय, येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवन येथे पार पडणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी मतदान दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत होणार आहे. मतमोजणी दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात येणार आहे. नॉमिनेशन स्वीकृतीसाठी मध्यवर्ती प्रशासकीय भवन, गंगापूर तहसील कार्यालय येथे व्यवस्था करण्यात आली आहे. गंगापूर तालुक्यात एकूण ३४७ मतदान केंद्रे यामध्ये एकुण मतदार २९८८९२ असुन त्यापैकी पुरुष १५५७८०, स्त्री १४३०९८ इतर १४ मतदारांचा समावेश आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी स्ट्राँग रूम इनडोअर स्टेडियम, गंगापूर श्री मुक्तानंद महाविद्यालय येथे तर मतमोजणी श्री मुक्तानंद महाविद्यालय, येथे होणार आहे.निवडणूक कालावधीत सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे आवाहन तहसील प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि.१५ जानेवारी २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१४० २३० ३०० | ५-८ | १२५ १७० ११६ | जोड ७५-५१-४८-८०-९२

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
३३० ४८० २२८ | २-४ | १४८ २८० ५३० | जोड ६२-२३-१४-४०-४९

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१४६ ३२५ ८८० | १-२ | १३८ १२९ ११७ | जोड ७१-१३-६२-२४-३४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारित आहे, कृपया दुरुपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *


# प्रवरा फार्मसीच्या विद्यार्थ्यांची स्वयंम प्रशिक्षणात यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** भारत सरकारच्या स्वयंम या राष्ट्रीय ऑनलाइन शिक्षण व्यासपीठावर सुरू असलेल्या तुम्ही आणि तुमचा आहार या १६ आठवड्यांच्या महत्त्वाच्या अभ्यासक्रमात लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोणी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. हा अभ्यासक्रम इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांच्या मार्फत राबविण्यात आला असून त्यास ६ क्रेडिट्स प्रदान करण्यात आले आहेत.

या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाच्या संस्थापक बॅचमधील अंतिम वर्ष बी. फार्मसी ४१ विद्यार्थी व ३ प्राध्यापक सहभागी झाले होते. त्यापैकी ३४ विद्यार्थी व ३ प्राध्यापक असे एकूण ३७ जणांनी यशस्वीरित्या पात्रता प्राप्त केली, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र जाधव यांनी दिली.

भविष्यात अशा उपयुक्त व करिअरवर्धक ऑनलाइन अभ्यासक्रमांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनीसहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.या अभ्यासक्रमामध्ये अन्न, पोषण व मानवी आरोग्य यांतील परस्परसंबंध शास्त्रीय पद्धतीने स्पष्ट करण्यात आला आहे. संतुलित आहार, पोषणतत्त्वे, अन्नसुरक्षा, अन्नभेसळ, जीवनशैलीजन्य आजार तसेच आहाराचा मानवी आरोग्यावर होणारा दीर्घकालीन परिणाम यांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांना या कोर्सद्वारे करण्यात आला. फार्मसी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम विशेष उपयुक्त ठरला असून सार्वजनिक आरोग्य, रुग्ण समुपदेशनासाठी आवश्यक मूलभूत ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. गणेश शिंदे, प्रा. चैताली भंवर, प्रा. प्रमोद डेगळे व प्रा. संजय सहा यांनी विशेष परिश्रम घेऊन मार्गदर्शन केले.

# दखल

## दहेश्वर विद्यालयात मकरसंक्रांतीनिमित्त तीळगूळ वाटप

**अमरापूर** : श्री मारुतराव घुले शिक्षण संस्थेच्या दहेश्वर माध्यमिक विद्यालयात मकरसंक्रांतीनिमित्त तीळगूळ वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक इंगावले सर होते. प्रास्ताविकात रणजित जाधव यांनी मकरसंक्रांतीचे महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात इंगावले सरांनी हा सण शेती व सूर्याच्या उत्तरायणाशी संबंधित असून रब्बी पिकांच्या कापणीमुळे शेतकऱ्यांचा आनंदाचा दिवस असल्याचे सांगितले.

सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करणे, नूतनीकरण व आत्मचिंतनाचे संकेत, तसेच ज्ञान–अंधकार यांचे प्रतीकात्मक महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमास बाळासाहेब तुपविहिरे, विकास राऊत, भाऊसाहेब बर्डे, रणजित जाधव, यशोदास वाघमारे, प्रमिला बोडखे, विशाल जोशी, देविदास आरगळे, गोरख लिंभोरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन वाघमारे यांनी केले व आभार जोशी यांनी मानले.

## आकाश पवारची एमपीएससीतुन पुरवठा नियंत्रण अधिकारीपदी निवड



**लिंपणगाव** : एमपीएससी राज्यसेवा परीक्षा २०२५ मध्ये उक्कडगाव ता. श्रीगोंदेचे सुपुत्र आकाश पवार यांनी पुरवठा नियंत्रण अधिकारीपदी निवड होऊन उल्लेखनीय यश मिळवले आहे. शेतकरी कुटुंबातील आकाशने प्राथमिक शिक्षण उक्कडगावच्या जिल्हा परिषद शाळेत घेतले, त्यानंतर पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयातून ११ वी व १२ वी, नंतर पुण्यातील नवरोजी वाडिया महाविद्यालयातून बी.एस्सी. केमिस्ट्री व स.पा. महाविद्यालयातून एम.ए. पॉलिटिकल सायन्स पूर्ण केले.

अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नेटबॉलमध्ये महाराष्ट्र वरिष्ठ पुरुष संघाचे कर्णधारपद भूषवले आणि बॉक्सिंग, वॉटर पोलोमध्ये राज्यस्तरीय पदके मिळवली. ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतही त्यांनी लक्ष वेधले. या यशाने क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातील तरुणांसाठी प्रेरणा निर्माण झाली असून, स्थानिक समाज, शिक्षक व कुटुंबीय यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## श्रीरामपूरात ७८ वा सशस्त्र दिन उत्साहात



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर आजी–माजी त्रिदल सैनिक संघटना व माजी पोलीस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूर येथील शहीद स्मारक येथे ७८ वा सशस्त्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक मोटार निरीक्षक (आरटीओ) लीना परदेशी यांच्या हस्ते शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून करण्यात आली.

यावेळी मेजर बाळासाहेब उंडे यांनी सशस्त्र दलाच्या इतिहासाची माहिती उपस्थितांना दिली. माजी पोलीस संघटनेचे अध्यक्ष तथा माजी पीएसआय संजय भोंडवे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच मेजर बाळासाहेब बनकर यांनी सशस्त्र दलाचे महत्त्व व योगदान याविषयी माहिती दिली.

याप्रसंगी मेजर अनिल लगड, मेजर बाळासाहेब उंडे, मेजर बाळासाहेब बनकर, मेजर सुधीर कोरगे, मेजर अन्वर बागवान, मेजर राशिनकर, मेजर अनिल राऊत, मेजर रजतराव कासार, मेजर रामदास वाणी, मेजर बाबासाहेब लांडे, मेजर दादासाहेब जगताप, मेजर राजू शिंदे, मेजर अनिल सिन्नरकर, मेजर मच्छिंद्र शेळके, मेजर चांगदेव गोडसे, मेजर महादेव ढवळे तसेच माजी पोलीस संघटनेचे माजी पीएसआय संजय भोंडवे, आर. जे. शिंदे, वसीम शेख, कराटे शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

# टाकळी कडेवळीत रंगणार कुस्तीचा रणसंग्राम!

## जिल्हा महाराष्ट्र केसरी निवड चाचणी स्पर्धेला सज्ज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : मातीचा सुगंध, गादीची शिस्त आणि पैलवानांची छातीठोक लढत टाकळी कडेवळीत (ता. श्रीगोंदा) या ठिकाणी शनिवारी रंगणार असून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ व अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने, तसेच श्रीगोंदा तालुका कुस्तीगीर संघ आणि टाकळी कडेवळी ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हा महाराष्ट्र केसरी निवड चाचणी कुस्ती स्पर्धा २०२५–२६ आयोजित करण्यात येणार आहे. अहिल्यानगर येथे पार पडलेल्या बैठकीत स्पर्धेचे ठरल्यानुसार स्पर्धा शनिवारी होणार असल्याची माहिती जिल्हा कुस्तीगीर संघाने दिली.

या स्पर्धेत वरिष्ठ गटातील गादी व माती कुस्ती, तसेच विविध वजनगटांतील जिल्हा केसरी निवड चाचण्या पार पडणार आहेत. स्पर्धा स्थळाची पाहणी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र केसरी व श्रीगोंदा तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष अशोकभाऊ शिर्के, अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव व छखड कुस्ती प्रशिक्षक प्रा. डॉ. संतोष भुजबळ, राष्ट्रीय कबड्डीपटू वैभव सुपेकर, पैलवान राकेश नवले यांच्यासह तालुका कुस्तीगीर संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या निवड चाचणीत अहिल्यानगर जिल्ह्यातील २०० ते २५० कुस्तीगीर विविध वजनगटांत आपले कौशल्य आजमावणार आहेत.

विजेत्या पैलवानांना मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार असून, हेच विजेते पुढे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत आहेत म्हणजे इथूनच राज्यपातळीचा रस्ता पैलवानांना मिळणार आहे थोडक्यात परंपरेची माती आणि आधुनिक व्यवस्थापन यांचा संगम असलेली ही स्पर्धा कुस्तीप्रेमींनी तयार राहा; टाकळी कडेवळीत लवकरच धोबीपछाडच्या गजरात इतिहास घडणार आहे. त्यामुळे या स्पर्धेमध्ये अनेक पैलवानांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवा असे आवाहन टाकळी कडेवळीत ग्रामस्थांचे वतीने करण्यात आले आहे.

# कठोर परिश्रमाने यशाला गवसणी घालता येते : सुरवसे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : येथील रयत शिक्षण संस्थेच्या जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या व जनता कन्या विद्यालयाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत शाखा तेथे समुपदेशक या उपक्रमांतर्गत मी कोण होणार ? या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांसाठी १४ जानेवारी (करिअर डे) ते २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन दरम्यान व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन आज जिल्हा उपनिबंधक श्री मंगेश जी सुरवसे साहेब यांच्या हस्ते पार पडले यावेळी संस्थेचे अध्यक्ष राकेश भाऊ पाचपुते एडवोकेट विठ्ठलराव काकडे व सर्व सेवक उपस्थित होते. या शिबिरातील पहिल्या दिवशी उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी करमर्षी काष्टी सेवा सोसायटीचे चेअरमन राकेश पाचपुते हे होते. जनता विद्यालयाचे प्र. प्राचार्य शिवप्रसाद मेहेत्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आपल्या व्याख्याना वेळी सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाला पर्याय नाही व कठोर परिश्रम केल्याने यश नक्की प्राप्त होते असा विश्वास व्यक्त केला. विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करताना अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन वेळेचा सदुपयोग व चांगले आरोग्य जोपासल्यास यश नक्की मिळते. असा विश्वासही व्यक्त केला. त्याचबरोबर सामाजिक जीवनामध्ये जीवन जगत असताना विद्यार्थ्यांनी महिलांचा आदर करावा , सार्वजनिक स्वच्छता पाळत असताना व्यसनापासून दूर रहावे. अँड. विठ्ठल काकडे यांनी विद्यार्थ्यांनी चांगला आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या जीवनात यश मिळवावे, असा विश्वास व्यक्त केला. मुख्याध्यापिका मंगल जोगदंड यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. तर आर.एस.पी.चे तालुका समादेशक ,समुपदेशक हरिश्चंद्र शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

# राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत आदित्य बुऱ्हाडे ठरला विजयी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मिरजगाव** : नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत मिरजगाव येथील रहिवासी आदित्य प्रभाकर बुऱ्हाडे याने नेत्रदीप असे यश संपादन करून ब्रॉंझ पदक पटकाविले आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी येथे सन.२०२५/२६ मधील नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत मिरजगाव येथील रहिवासी व कडा येथील स्केटिंग क्लासचा विद्यार्थी आदित्य प्रभाकर बुऱ्हाडे यानी वयोगट १४ मध्ये धमाकेदार कामगिरी करत चौथा क्रमांक पटकाविला असून त्याने ब्रॉंझ पदकाची कमाई केली आहे.

मुळशी येथे घेण्यात आलेली ही स्पर्धा भारतातील सर्वोत्कृष्ट स्केटर्स साठी आयोजित केलेली एक वार्षिक स्पर्धा असुन या स्पर्धेत विविध राज्यांतून असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या चमकदार कामगिरीवर त्याची गोवा येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय निवड चाचणीसाठी निवड झालेली आहे. आंतरराष्ट्रीय निवड चाचणीसाठी टीम टॉपरचा आदित्य हा कडा स्केटिंग क्लासचा पहिला विद्यार्थी ठरला आहे. त्याला अहेमद पठाण सर यांनी प्रशिक्षण दिले आहे. आदित्य हा मिरजगाव येथील नामांकित ज्वेलर्स व्यापारी पांडुरंग बुऱ्हाडे यांचा पुतण्या व कडा येथील महावीर न्यु इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी आहे. त्याच्या यशामुळे मिरजगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. कु.बुऱ्हाडे याला पुढील स्पर्धेसाठी टीम टॉपरचे अध्यक्ष प्रशांत पाटोळे, जमीर सय्यद, दाऊद शेख, अजीम शेख, महेश राऊत, आकाश गाडेकर, प्रमोद यादव व प्रशिक्षक अहेमद पठाण यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्याकडून पत्रकारांचा सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी** : पत्रकार दिनानिमित्त पाथर्डी पोलीस ठाण्यात आयोजित विशेष कार्यक्रमाने लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला केवळ सन्मानच नाही, तर नव्या ओळखीची दिशा मिळवून दिली. पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी तालुक्यातील पत्रकारांचा सत्कार करून पोलीस–पत्रकार संबंधातील विश्वास दृढ करण्याचा उपक्रम राबवला. कायदा–सुव्यवस्थेच्या धावपळीतून वेळ काढून पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम शहरात चर्चेचा विषय ठरला. विलास पुजारी हे शिस्तबद्ध, कर्तव्यनिष्ठ व संवेदनशील अधिकारी म्हणून ओळखले जातात. गुन्हे नियंत्रण, नागरिकांच्या तक्रारी आणि सामाजिक घटकांशी संवाद या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना आदर व संवाद या तत्त्वांवर त्यांचा विशेष भर असतो. कार्यक्रमात बोलताना पुजारी म्हणाले, पत्रकार समाजाचा आरसा आहे. सत्य निर्भीडपणे मांडणाऱ्या पत्रकारांमुळे व्यवस्था अधिक जबाबदार बनते. यावेळी त्यांनी पत्रकारितेचा इतिहास, पहिले वृत्तपत्र, छपाई प्रक्रिया आणि पत्रकारांचे सामाजिक योगदान यावरही माहितीपूर्ण संवाद साधला. कार्यक्रम हा केवळ सत्कारापुरता न राहता वैचारिक चर्चेत परिवर्तित झाला. पुजारी पुढे म्हणाले, पत्रकार प्रश्न विचारतो आणि पोलीस कृती करतो हे परस्पर नाते लोकशाहीला बळकट करते. पुजारी यांसारखे अधिकारी संवाद साधतात तेव्हाच लोकशाही अधिक सक्षम होते. यावेळी उपस्थित पत्रकारांनी टाळ्यांचा कडकडाट करून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री, जनार्दन बोडखे, अनिल खाटेर, हरिहर गर्जे, सुनील नजन, शन्नो पठाण, सचिन दिनकर आदी उपस्थित होते. तसेच पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे व विलास जाधव यांनीही सहभाग नोंदवला. हा उपक्रम पोलीस–पत्रकार संबंधांना परस्पर सन्मानाची उंची देत लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला अधिक बळकट करणारा ठरला.

# सभासदांनी ऊस गाळपास देऊन कारखान्याला सहकार्य करावे : राजेंद्र नागवडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचा ५१ वा गळीत हंगाम चालू असून सभासद व ऊपादक शेतकरी, ऊसतोड मुकादम, मजूर, वाहतूकदार व ठेकेदार या सर्वांच्या सहकार्याने गाळप हंगाम अतिशय चांगल्या प्रकारे चालू आहे. आज अखेर कारखान्याचे ४ लाख ७२ हजार ३४० मे. टन ऊस गाळप झाले असून सरासरी प्रतिदिन ६५०० मे.टन उसाचे गाळप होत आहे. कारखान्याचा गाळप हंगाम अजून एक महिना म्हणजे १० फेब्रुवारी पर्यंत चालणार असल्यामुळे सभासद शेतकऱ्यांनी थोडे थांबून आपला ऊस इतर कारखान्यास न देता नागवडे कारखान्यास गळीतास देऊन सहकार्य करण्याचे आवाहन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नागवडे यांनी म्हटले आहे की, कारखान्याने चालू गळीत हंगामात उच्चांकी ३१५० रुपये प्र.मे. टन ऊस दर जाहीर केला असून त्यापैकी पहिला हप्ता रुपये ३००० आता पर्यंत अदा करण्यात आलेला आहे नागवडे कारखाना ऊस भावाबाबत कायम अग्रेसर राहिला असून सतत सभासद शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केलेला आहे. नागवडे पुढे म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी सातत्याने सभासद शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याची भूमिका घेतली. त्यांच्या विचारांचा व संस्काराचा वारसा घेऊन त्यांच्या नंतरही कारखान्यामार्फत सभासद शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सहकारी साखर कारखानदारी समोर अनेक आव्हाने आहेत.

त्यावर मात करून नागवडे कारखाना प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. नागवडे सहकारी साखर कारखाना ही तालुक्याची सहकार गंगोत्री असून विकासाची मूळ मातृसंस्था आहे. आतापर्यंतच्या वाटचालीमध्ये सभासद शेतकऱ्यांनी चांगले सहकार्य केलेले आहे आणि भविष्यातही निश्चितपणे करतील याचा विश्वास आहे. जेवढे जास्त गाळप होईल तेवढा संस्थेचा व सभासद शेतकऱ्यांचा फायदा होईल. त्यामुळे किमान १० फेब्रुवारी अखेरपर्यंत सभासद शेतकऱ्यांनी थांबून आपला ऊस आपल्या कारखान्यास गळीतास देऊन सहकार्य करण्याचे आवाहन राजेंद्र नागवडे यांनी केले आहे.

# लोकनेते स्व. शिवाजीराव नागवडे जयंती महोत्सव

## प्रबोधन व्याख्यानमाला व विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : श्रीगोंदा येथील लोकनेते स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे प्रतिष्ठान आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. बापू यांच्या जयंती महोत्सवानिमित्त प्रबोधन व्याख्यानमाला व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. राजेंद्रदादा शिवाजीराव नागवडे यांनी दिली.

दिनांक १६ ते २० जानेवारी दरम्यान हा महोत्सव साजरा होणार असून प्रबोधन व्याख्यानमालेचे यंदाचे १८ वे वर्ष आहे. दिनांक १७ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे 'उद्याच्या आनंदासाठी' या विषयावर पहिले पुष्प गुंफतील.

१८ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता दैनिक लोकमत पुणेचे संपादक मा. संजय आवटे 'चला उभारूया युवा पिढी' या विषयावर दुसरे पुष्प गुंफतील.

तर १९ जानेवारी रोजी ह.भ.प. अविनाश महाराज भारती 'भारतीय संस्कृती आणि आजची तरुणाई' या विषयावर व्याख्यान देतील. जयंती दिनी १९ जानेवारीला रक्तदान शिबीर व अभिवादन प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच २० जानेवारी रोजी महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ व सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या काव्यधारेचा कार्यक्रम संपन्न होईल.

महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात आनंदी बाजार, पाककला, क्रीडा स्पर्धा, रांगोळी, मेहंदी, वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, एकांकिका, गुणदर्शन, तसेच बॉलिवूड डे, ट्रॅडिशनल डे, मिसमॅच डे आदी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणे हा असल्याचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थी, पालक, महिला, तरुणाई व तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष व नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले.

# केंद्रिय कन्या शाळेत शौचालय अभावी मुलींची कुचंबना !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : पाणंदमुक्तिचा डंका आणि घरोघरी शौचालय ही मोहिम मोठा गाजाबाजा करून गेली असली तरी शहरातील केंद्रिय कन्या शाळेतील मुलिंची शौचालया अभावी मोठी कुचंबना होत असल्याचे खेदजनक चित्र पहावयास मिळते. शाळा तिथे शौचालय आवश्यकच असुन बहुतांशी शाळेत ही सुविधा उपलब्ध असली तरी केंद्रिय कन्या शाळा मात्र यास अपवाद आहे.

नव्या खोल्यांच्या बांधकामावेळी जुने शौचालय जवळपास दोन वर्षांपासून बंद पडले .तेव्हापासुन शाळेतील मुलीसह शिक्षिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते याकडे कोण लक्ष देणार हा प्रश्न आहे. पहिली ते सातवी पर्यंत या शाळेत १०६ मुली शिक्षण घेत असुन यासाठी सात शिक्षकापैकी पांच महिला शिक्षीका कार्यरत आहेत .बहुधा या सरकारी शाळेचा फायदा गरिबांच्याच मुली घेत आहेत , अन्य शाळेत शौचालय उपलब्द असले तरी गरीबांच्या मुली शिकत असलेल्या शाळेची ही अवस्था आणि यासाठी कोण जबाबदार असा प्रश्न आहे.

यावेळी आदर्श पुरस्कार प्राप्त उद्योजक कचरू आघाव, दादासाहेब खोले, आदिनाथ गवळी, शालेय समितीचे बाबु ढवाण यांचेसह शिक्षक, शिक्षीका व मुली उपस्थित होत्या. आमचेसाठी नाही किमान या गरीब मुलीसाठी तरी शौचालय ही प्राथमिक गरज तातडीने पुर्ण व्हावी अशी अपेक्षा खेडकर यांनी व्यक्त केली.

### दोन्ही घरचा पाहुणा उपाशी !

जिल्हा परिषदेची ही शाळा नगरपंचायत क्षेत्रात असली तरी ती अद्याप नगरपंचायतकडे हस्तांतरीत नाही म्हणून नगरपंचायत दुर्लक्ष करते तर नगरपंचायत क्षेत्रात असल्याने पंचायत समिती स्तरावरून देखील दुर्लक्ष होते या दोन्हीच्या मधे मात्र शाळेची ससेहैळपट सुरू आहे.

### तीन गरीबांच्या मुलीचे शैक्षणीक पालकत्व !

निरंजन सेवाभावी संस्थेचे तथा शिरूरचे भुमिपुत्र जयेश कासट यांनी या शाळेतील गरीबाच्या तीन मुलीचे शैक्षणीक पालकत्व स्विकारून मंगळवारी त्यांना शैक्षणीक साहित्य वाटप करण्यात आले. या छोटेखानी कार्यक्रमात मुख्याध्यापक गोरक्ष खेडकर यांनी ही खंत बोलून दाखवली.

# कोट्यवधींच्या शेअर मार्केट घोटाळ्यात दिरंगाई; पीडित शिक्षकाचा २६ जानेवारीला आत्मदहनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शेवगाव तालुक्यातील शेअर मार्केट गुंतवणुकीत कोट्यवधींची फसवणूक झालेल्या प्रकरणात पोलिस व प्रशासनाच्या ढिसाळ भूमिकेविरोधात पीडित शिक्षक अवधूत विनायक केदार यांनी थेट आत्मदहनाचा इशारा दिल्याने खळबळ उडाली आहे.

त्यांनी हा इशारा प्रजासत्ताक दिनी, म्हणजेच २६ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता अहिल्यानगर पोलिस परेड ग्राउंड येथे, लेखी स्वरूपात दिला आहे. या प्रकरणात साईनाथ कल्याण कवडे आणि त्याचे नातेवाईक व मित्रांसह अनेक जणांवर गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. आरोपी दीड वर्षांपासून मोकाट असून, पीडितांच्या तक्रारी, निवेदने आणि विनंत्यांनंतरही ए.ज.थ. आणि स्थानिक पोलिसांकडून ठोस कारवाई न झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. मुख्य आरोपी गुजरातमध्ये अटक झाला असला तरी इतर आरोपी फरार, तसेच त्यांच्या नावावरील मालमत्ता, बँक खाते, लॉकर जप्तीची प्रक्रिया सुरू न झाल्याची माहिती आहे. हे प्रकरण चझखऊ व इणऊड कायद्यात येत असतानाही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा दावा पीडितांचा आहे.

मी २५ वर्षे प्रामाणिक शिक्षक म्हणून सेवा दिली, पण पोलीस व सरकारी यंत्रणांनी आत्मदहनाशिवाय पर्याय ठेवलेला नाही, असे केदार यांनी निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणी गुंतवणूकदारांनी जिल्हा प्रशासन व शासनाने तातडीने हस्तक्षेप करून आरोपींना अटक व मालमत्ता जप्त करण्याची मागणी केली आहे.

# शहरात फतव्यांचा खेळ

## मतदारांची दिशाभूल आ. जगताप यांचा दावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील प्रभाग क्रमांक ५ आणि १० मध्ये एका विशिष्ट समाजाकडून मतदारांची दिशाभूल करणारे फतवे काढले जात असून नागरिकांना पाकिटामधून पैसे, पत्रके व मतदानाबाबत सूचना दिल्या जात असल्याचा आरोप आमदार संग्राम जगताप यांनी केला आहे. यासंदर्भातील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हायरल व्हिडीओच्या पार्श्वभूमीवर आमदार जगताप यांनी माध्यमांशी संवाद साधताना तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली.

ते म्हणाले की, व्हिडीओमध्ये एका राजकीय पक्षाचे नेते समोर बसलेले असताना संबंधित व्यक्ती आपने कौम के ऊपर ही महापौर बैठने मांगता है असे वक्तव्य करताना दिसत आहे. हा प्रकार अत्यंत दुर्दैवी असून यामुळे समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. आमदार जगताप पुढे म्हणाले की, अशा प्रकारच्या कृतींमुळे देशाचे नुकसान होत असून याची सुरुवात याच लोकांकडून होते. या संदर्भातील पुरावे अहिल्यानगरवासीयांसमोर आहेत, असा दावाही त्यांनी केला. दरम्यान, हिंदू मतदारांनी सावध राहून निवडणुकीच्या माध्यमातून जागृत भूमिका घ्यावी, असे आवाहनही आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

द•ख•ल

## श्री ज्ञानेश्वर विद्यालयाची संस्कृती बाजीराव नवले राज्यात १५ वी



**आळंदी :** कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून ३ लाख १४ हजार ६६६ विद्यार्थी बसले होते. या पार्श्वभूमीवर आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कु.संस्कृती बाजीराव नवले हिने इंटरमिजिएट परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत १५ वा क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे अशी माहिती संस्थेचे सचिव अजित वडगांवकर यांनी दिली आहे.

श्री ज्ञानेश्वर विद्यालय हे या परीक्षेचे केंद्र असून, याच प्रशालेतील विद्यार्थिनीने मिळवलेल्या या यशामुळे आळंदीच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेला नवा गौरव प्राप्त झाला आहे. संस्कृतीला कलाशिक्षक दत्तात्रय मारुती वंजारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

ज्ञानेश्वर विद्यालयातील अनेक विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या तालुका व जिल्हास्तरावरील कला परीक्षांत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल कु. संस्कृती बाजीराव नवले व कलाशिक्षक दत्तात्रय वंजारी यांचे संस्थेचे सचिव अजित वडगावकर तसेच प्राचार्य किसन राठोड यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## संत चारधाम चरित्र ग्रंथाचे श्री क्षेत्र देवगड येथे प्रकाशन

**नेवासा :** तालुक्यातील भूलोकीतील स्वर्ग असलेल्या श्री गुरूदेव दत्तपीठ श्री क्षेत्र देवगड संस्थान येथे प्रा.डॉ.सुभाष शेकडे लिखित संत चारधाम संत चरित्र ग्रंथांचे प्रकाशन देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते पार पडले. साधु – संताचे विचार हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य असा ठेवा असल्याचे प्रतिपादन महंत श्री भास्करगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले.



संतांचे अध्यात्मिक विचार हे ईश्वरभक्ती,प्रेम,समानता आणि मानवतेवर आधारित आहेत. संत भगवान बाबा , संत वामनभाऊ यांनी अध्यात्माद्वरे सर्वांमध्ये परमेश्वर पाहणे, मानवी सेवा करणे, अज्ञानांना सज्ञान बनवणे व बहुजनांना अध्यात्माच्या मार्गाने घेऊन जाण्यातच खरा परमार्थ मानला. ज्ञानोबा – तुकोबांच्या लेखणीतून आणि विचारातून उतरलेला भक्तिमार्ग संत चारधाम या चरित्र ग्रंथातील सर्व संतांनी सर्वसामान्यांसाठी सोपा करून दिला.

संतांनी अंधश्रद्धेच्या विचारांना फाटा देऊन सर्वांना बरोबर घेऊन अध्यात्म रंगात रंगवून सर्वसामान्यांना समतेचा संदेश दिला. भाऊ – बाबांचे कार्य हे संत किसनगिरी बाबांच्या कार्याशी सुसंगत असे होते. त्यांचे एकमेकांशी अतूट असे आध्यात्मिक नाते होते.संत चारधाम या चरित्र ग्रंथातील संत भगवान बाबा, संत वामनभाऊ, संत नारायण महाराज, संत खंडोजी बाबा या चारही संतांच्या चरित्र वाचनाने चारधाम घडल्याचे पुण्य वाचकाच्या पदरात पडेल असा संदेश ह. भ. प. भास्करगिरी महाराज यांनी दिला.

## सासवड शहर पत्रकार संघाचा तिळगुळ कार्यक्रम उत्साहात

**माळशिरस :** हिंदुंचा पवित्र सण म्हणून ओळखला जाणारा मकर संक्रांत हा दिवस सासवड येथील पालखी तळावर तिळगुळ कार्यक्रम वाटप करून साजरा करण्यात आला. नवीन वर्षाचे स्वागत व तिळगुळ देऊन स्नेहभाव जपण्याच्या या स्तुत्य कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार संघ सासवड शहर यांनी प्रतिवर्षाप्रमाणे केले होते. सदरच्या कार्यक्रमास माजी आमदार संजय जगताप यांसह सर्व नगरसेवक, डॉक्टर्स, शिक्षक मंडळी, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, सामाजिक संघटना, सासवडकर नागरीक यांनी उपस्थिती दाखवली.

संजय जगताप यांसह उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, नगरसेवक मंदार गिरमे, बाळासाहेब भिंताडे, ज्ञानेश्वर गिरमे, स्मिता जगताप, व्यापारी संघटनेचे संजय चव्हाण, मेडीकल संघटनेचे डॉ प्रवीण जगताप, संतोष जगताप, डॉ. राजेश दळवी, कुंडलिक मेमाणे, माजी नगराध्यक्षा कलाताई फडतरे, पांडुरंग गायकवाड, स्वानंद लोमटे, सुधीर हेंद्रे, धनंजय साबळे, परशुराम देशमुख, ॲड. दिलीप निरगुडे, संदीप टिळेकर, प्रा. सुभाष तळेकर, शिवाजी झुरंगे

संजय पवार, ॲड अशपाक बागवान ॲड अमोल जगताप यांसह अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. पत्रकार संघाच्या सदस्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.




# सेंट्रींगचे पैसे मागणे पडले महागात; तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील निवडुंगे गावात सेंट्रींगचे साहित्य भाड्याने दिल्यानंतर त्याचे पैसे व साहित्य परत मागितल्याच्या कारणावरून एका गवंडी व्यावसायिकावर प्राणघातक हल्ला झाल्याची गंभीर घटना घडली आहे. लाकडी दांड्याने तसेच लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत संबंधित व्यावसायिक जखमी झाला असून, भांडण शांत करण्यासाठी मध्ये पडलेल्या महिलेलाही मारहाण करण्यात आली. या घटनेप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



माळीबाभुळगाव येथील बबन तुपे हे सेंट्रींगचे साहित्य भाड्याने देण्याचा व्यवसाय करतात. त्यांनी निवडुंगे येथील अरुण ढवळे याला बांधकामासाठी सेंट्रींगचे साहित्य दिले होते. मात्र बराच कालावधी लोटूनही साहित्य तसेच भाड्याची रक्कम परत मिळाली नसल्याने तुपे हे सुरेखा पालवे यांच्यासह ढवळे यांच्या घरी गेले. त्यावेळी भाड्याबाबत विचारणा करताच अरुण ढवळे याने संतापून हातातील लाकडी दांड्याने तुपे यांच्या डोक्यावर व पायावर वार करून त्यांना जखमी केले.

यानंतर दीपक ढवळे व आणखी एका अनोळखी इसमाने मिळून तुपे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या झटापटीदरम्यान भांडण मिटवण्यासाठी पुढे आलेल्या सुरेखा पालवे यांनाही शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

जखमींना तातडीने पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारानंतर पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, संबंधित तिघांविरोधात मारहाण, शिवीगाळ व धमकीचे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

मेहनतीने उदरनिर्वाह करणाऱ्या कामगारांवर होणाऱ्या अशा हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहेत.

## मस्जिदींवरील विनापरवाना भोंग्यांविरोधात कारवाईची मागणी ; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**पाथर्डी :** तालुक्यातील मस्जिदींवरील विनापरवाना व मोठ्या आवाजातील भोंगे तात्काळ काढण्यात यावेत, या मागणीसाठी आज पाथर्डी पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. हिंदुत्ववादी नेते व मढी देवस्थानचे अध्यक्ष, सरपंच संजय मरकड यांच्या वतीने हे निवेदन पोलीस निरीक्षकांना सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि. १६ ते १९ जून २०२४ या कालावधीत अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्ह्यातील सर्व मस्जिदींवरील भोंगे काढावेत, या मागणीसाठी उपोषण करण्यात आले होते. त्या वेळी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी याबाबत लेखी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनानंतरही आजतागायत तालुक्यातील अनेक ठिकाणी विनापरवाना व मोठ्या आवाजातील भोंगे सुरू असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

मोठ्या आवाजातील भोंग्यांमुळे शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अभ्यासावर परिणाम होत असून, रुग्णालयातील रुग्ण, ज्येष्ठ नागरिक तसेच सामान्य नागरिकांना मोठा मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालय व शासनाने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला.

प्रशासनाने तात्काळ कारवाई करून विनापरवाना भोंगे काढावेत, अन्यथा संपूर्ण तालुक्यात जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वरे देण्यात आला आहे. या संभाव्य आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीस प्रशासन पुढील काय भूमिका घेते, याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## निरगुडसरची शितल झाली मास्टर ऑफ डॉक्टरेट , राज्यात दुसरा क्रमांक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर** - निरगुडसर गावची शेतकरी कुटुंबातील सुकन्या शितल रंगनाथ शिंदे हिने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून मास्टर ऑफ डॉक्टरेट (चू) पदवी मिळवली आहे. या परीक्षेत तिने राज्यात दुसरा क्रमांक पटकावत आपल्या कर्तृत्वाची ठळक छाप उमटवली आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही शिक्षणाच्या प्रवासात तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर तिने सर्व अडथळ्यांवर मात करत हे यश मिळवले.




निरगुडसर–ता.आंबेगाव येथील ग्रामस्थांनी डॉ.शितल शिंदे हिने वैद्यकीय क्षेत्रात एम.डी. पदवी मिळवल्यानंतर डॉ.वैष्णवी टाव्हरे यांच्या हस्ते सन्मान केला. यावेळी उपस्थित ग्रामस्थ.

या यशामध्ये आई–वडील रंगनाथ शिंदे व मंगल शिंदे, भाऊ साक्षर शिंदे,भाऊजई निशा शिंदे तसेच मामा विजय थोरात, सुरेश थोरात व सुभाष थोरात व सोपान थोरात यांचा मोलाचा वाटा असल्याचे कु. शितल शिंदे हिने सांगितले. कुटुंबीयांनी दिलेले सातत्यपूर्ण पाठबळ, प्रेरणा आणि विश्वास यामुळेच हे यश शक्य झाले, असेही तिने नमूद केले. दरम्यान, राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी कु. शितल शिंदे हिचे अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तिचे यश हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. शितल शिंदेच्या या घवघवीत यशामुळे निरगुडसर गावासह आंबेगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या यशाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवी दिशा व प्रेरणा मिळाली आहे.

# बारामती सहकारी बँकेच्या संचालकपदी ओंकार देवळे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सचिन सातव यांनी बारामती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. बारामती बँकेच्या संचालक मंडळाची (दि:१५) रोजी बैठक पार पडली . या बैठकीत सचिन सातव यांनी आपला राजीनामा सादर केला. त्यानंतर रिक्त झालेल्या जागी ओंकार देवळे यांची संचालकपदी निवड करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार सातव यांनी राजीनामा दिला आहे.

या बैठकीदरम्यान सातव यांनी अध्यक्षपदाच्या कार्यकाळात बँकेच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्याबद्दल संचालक मंडळाने त्यांचे आभार मानले व पुढील कार्यकाळासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच बँकेच्या व्यवस्थापन मंडळामध्ये रिक्त झालेल्या जागेवर ओंकार किशोर देवळे यांची व्यवस्थापन मंडळ सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, उपाध्यक्षा सौ. नुपूर शहा (वडूजकर), तज्ञ संचालक प्रितम पहाडे (सी.ए.), ॲड. शिरीष कुलकर्णी अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ तसेच संचालक रोहित घनवट, किशोर मेहता, विजयराव गालिंदे, देवेंद्र शिर्के, उध्दव गावडे, नामदेवराव तुपे, जयंत किकले, रणजित धुमाळ, मंदार सिकची, डॉ. सौरभ मुथा, संचालिका डॉ. वंदना पोतेकर, कल्पना शिंदे, तसेच तज्ञ संचालक ॲड. रमेश गानबोटे तसेच कार्यकारी संचालक विनोद रावळ व मुख्यालयातील अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर प्रशस्तीपत्रका पुरते मर्यादित राहू नये : नितिन औताडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून महाविद्यालयातील युवक युवतींना यात सहभागी करून स्वावलंबनाचे धडे दिले जातात. मन मनगट व बुद्धीच्या जोरावर भविष्यात वाटचाल करत असताना कुठलीच अडचण येत नाही. शिबिराचा उद्देश भौतिक व शारीरिक विकास करणे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिर प्रशस्तीपत्रका पुरते मर्यादित राहता कामा नये. यातून सामाजिक बांधिलकी जोपासत राष्ट्र प्रेमाची भावना जागृत होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख नितीनराव औताडे यांनी केले.




कोपरगाव तालुक्यातील वेस सोयगाव येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पोहेगांव येथील हिंदुहृदयसम्राट मान. बाळासाहेब ठाकरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात मार्गदर्शन करताना औताडे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच जयाताई माळी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष नानासाहेब शेंडगे, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. शांतीलाल जावळे, उपसरपंच आनंदा भडांगे, प्रवीण कोल्हे, छगन गोसावी, धणेश भडांगे, दत्तात्रय खंडीझोड, अशोक रहाणे, प्रा.आर बी गायकवाड, प्रा. गाधीले बी एस, वाघमारे डी एस, सचिन भांड, प्रा सांगळे, विद्यार्थी प्रतिनिधी पानगव्हाणे उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शांतीलाल जावळे यांनी केले. वेस सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर गेल्या चार वर्षापासून महाविद्यालयाच्या वतीने राबवण्यात येत आहे. शाश्वत विकासासाठी युवक ,पाणलोट आणि पडीत जमिन व्यवस्थापन या उपक्रमांतर्गत हे शिबिर आहे.

या श्रम संस्कार शिबिरात स्वच्छ व स्वस्थ भारत, वृक्षारोपण व संवर्धन, जलसंवर्धन व जल व्यवस्थापन, श्रमसंस्कार, आरोग्य जनजागृती, नव मतदार जनजागृती व नाव नोंदणी कार्यक्रम, सामाजिक प्रबोधन पर पथनाट्य, पडीत जमीन विकास, शिवारभेट व बालविवाह प्रतिबंध उपक्रम राबवण्यात येत आहे.

आज शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता या शिबिराचे सांगता सुभाष रहाणे सामाजिक कार्यकर्ते व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी नानासाहेब शेंडगे यांच्या प्रमुख उपस्थित होणार असल्याची माहिती महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. जावळे यांनी दिली.

## मराठवाड्यात पाच वर्षांत ५००० शेतकऱ्यांच्या आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बीड :** महाराष्ट्राचा दुष्काळी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी अत्यंत चिंताजनक आणि भयावह आहे. गेल्या पाच वर्षांत या भागात ५,००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असून, यामध्ये सर्वाधिक ११२९ आत्महत्यांची नोंद गेल्या वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये झाली आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाने बुधवारी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत अहवालातून ही विदारक स्थिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०२१ मध्ये ८८७, २०२२ मध्ये १०२३, २०२३ मध्ये १०८८ आणि २०२४ मध्ये ९४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. मात्र, २०२५ या एकाच वर्षात हा आकडा ११२९ वर पोहोचला. जिल्हावार आकडेवारी पाहता, बीड जिल्ह्यात सर्वाधिक २५६ आत्महत्या झाल्या आहेत. त्यापाठोपाठ छत्रपति संभाजीनगर २२४, नांदेड १७०, धाराशिव १४१, परभणी १०४, जालना ९०, लातूर ७६ आणि हिंगोलीत ६८ शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलले. विशेष म्हणजे, मे ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत मराठवाड्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि महापुराच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हवालदिल झाला होता. एकूण आत्महत्यांपैकी ५३७ घटना याच सहा महिन्यांच्या काळात घडल्या आहेत, जेव्हा निसर्गाच्या कोपामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले होते.

# हॉटेल पार्किंगच्या वादातून जीवघेणा हल्ला, मुख्य आरोपी अटकेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** भिगवण रोडवरील वृंदावन हॉटेलसमोर केवळ वाहन पार्किंगच्या कारणावरून तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी तन्मेष सुधीर साळुंखे याला अखेर पोलिसांनी अटक केली असून त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



दि.२९ नोव्हेंबर रोजी मानस दीपक पाटील (रा.तानाई नगर, बारामती) हे आपल्या मित्रांसह जेवणासाठी वृंदावन हॉटेलमध्ये गेले होते. हॉटेलच्या बाहेर वाहन पार्किंगवरून वाद झाला. या वादातून आरोपी तन्मेष साळुंखे, राम लोखंडे, माउली रणदिवे, ओंकार भोसले व त्यांच्या ११ ते १२ साथीदारांनी मानस पाटील यांच्यावर दगड व लोखंडी गजाने डोक्यात मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांच्या सोबत असलेल्या मित्रांनाही पिकअपमध्ये येऊन बेदम मारहाण करण्यात आली.

या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून विविध कलमान्वये गुन्हा दाखल आहे. आरोपी राम अनिल लोखंडे (वय २४) याला यापूर्वी अटक करण्यात आली होती. फरार आरोपींचा शोध सुरू असतानाच मुख्य सूत्रधार तन्मेष साळुंखे याला (दि.१३) जानेवारी रोजी अटक करण्यात आली आहे.

बारामती तालुक्यात कायदा–सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिला आहे.'

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी टीम पो.उपनि. युवराज पाटील, हवालदार मनोज पवार, सागर देशमाने, भारती खंडागळे, पोलीस अंमलदार राजू बन्ने व दादा दराडे सहभागी होते. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील व पोलीस अंमलदार राजू बन्ने करीत आहेत.

# चारचाकी वाहनांसाठी एमएच ४२ बी डब्ल्यू क्रमांकाची नवीन मालिका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** खाजगी चारचाकी संवर्गातील वाहनांसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे एमएच ४२ बी डब्ल्यू क्रमांकाची नवीन मालिका सुरु करण्यात येणार असून आकर्षक क्रमांक राखून ठेवण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या खाजगी चारचाकी वाहनांसाठी आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक हवा असेल त्यांनी २० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३ वाजेच्यादरम्यान धनाकर्षासह (डी.डी.) विहित नमुन्यात अर्ज करावा. एकाच क्रमांकाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २१ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल.

यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डी.डी. जमा करावयाचा असेल त्यांनी २१ जानेवारी रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ४ वाजता संबंधित अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रक्कमेचा धनाकर्ष भरलेल्या व्यक्तीस नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे.




अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, छायाचित्र ओळखपत्र तसेच पॅनकार्डची स्वाक्षांकित प्रत आणि ६ध ठढज, इअठअचअढख या नावाने राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेचा बारामती येथील धनाकर्ष असावा.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नसल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यानी कळविले आहे.







# महापालिका निवडणुकीत चुरशीचे मतदान

## सकाळी मंद, दुपारनंतर वेग; गोंधळ, बिघाड,आक्षेपांमुळे रंगले वातावरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी सकाळपासून मतदानाला सुरूवात झाली. सुरुवातीलाच मतदान संथ गतीने होत असून पहिल्या दोन तासांत अवघे ८ टक्के मतदान झाले. साडेअकरा वाजता मतदानाचा टक्का २०.१६ झाला व एकूण ६१ हजार ८८१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दुपारनंतर मात्र वेग वाढला व मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांची धावपळ सुरू झाली. अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांकडून मतदारांना मतदान केंद्रांवर नेण्यासाठी प्रयत्न सुरू होते. क्रॉस वोटिंगमुळे काही प्रभागांत धक्कादायक निकाल लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

महापालिकेच्या एकूण ६३ जागांसाठी २७८ उमेदवार रिंगणात असून, चुरशीच्या लढतीमुळे वातावरण तापले. निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या वाद-विवाद, हाणामारीच्या घटना, तसेच राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे निवडणूक अधिकच रंगली. काही प्रभागांत काँटे की टक्कर, तर काहींच्या अस्तित्व व प्रतिष्ठेची लढाई पाहायला मिळाली.

शहरातील ७० शाळांमधील ३४५ केंद्रांवर मतदान होत असून तब्बल ३ लाख ७ हजार मतदार मतदान करणार आहेत. मतदान केंद्रांवर दिव्यांग व ज्येष्ठांसाठी व्हीलचेअर, पिण्याचे पाणी व आरोग्य सुविधांची चोख व्यवस्था होती. गावडे मळा येथे पिंक मतदान केंद्र तर सावेडी व रेल्वे स्टेशन परिसरात मॉडेल मतदान केंद्र होते.

निवडणूक प्रक्रियेकरिता १,८०० कर्मचारी व २,००० पोलीस कर्मचारी तैनात होते. शहरातील ३५ संवेदनशील केंद्रांवर विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला तर मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख केली जात होती. मतदारांना स्लीप देण्यासाठी उमेदवारांचे प्रतिनिधी मतदान केंद्रांच्या बाहेर दिसत होते.

दरम्यान, काही ठिकाणी किरकोळ गोंधळही झाला. प्रभाग १७ मधील इंदिरानगर, मोहिनी नगर व समर्थ शाळेत मतदान यंत्रात आलेल्या बिघाडामुळे मतदारांना तब्बल एक तास प्रतीक्षा करावी लागली. मशीन बदलल्यानंतर मतदान पुन्हा सुरू झाले. तसेच गुलमोहर रोडवरील आनंद शाळेत बोगस मतदानाच्या आरोपावरून अपक्ष उमेदवारांनी घोषणाबाजी केली. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

याशिवाय प्रभाग दोनमध्ये मतदारांना विशिष्ट उमेदवारांच्या नावे व चिन्हासह चिठ्ठ्या दिल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार अमोल खाडे यांनी याबाबत निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार केली.

मतदानाबाबत जागृतीसाठी सुनील सकट व त्यांच्या कुटुंबीयांनी मतदार ओळखपत्रांसह सेल्फी काढून 'आम्ही मतदानाला, तुम्हीही या!' असा संदेश देत अनोखा उपक्रम राबवला.

---

**द•ख•ल**

### अहिल्यानगर जिल्हा दिव्यांग कर्मचारी संघटनेची जिल्हा कार्यकारणी जाहीर

**अहिल्यानगर :** दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांच्या हक्कासाठी लढा देणाऱ्या महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेची नूतन जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. असे राज्यउपाध्यक्ष संतोष सरवदे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे कळविले आहे यामध्ये जिल्हाध्यक्ष म्हणून श्री बाळासाहेब चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ठिकाण संघटना कार्यालय जुनी इमारत जिल्हा परिषद येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली. नूतन कार्यकारणीमध्ये जिल्ह्यातील विविध विभागांतील कार्यक्षम दिव्यांग कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

### कै.लालाशेठ बिहाणी विद्यामंदिरची उज्वल परंपरा कायम

**राहुरी :** महाराष्ट्र शासनाच्या कलासंचालनालय मुंबईतर्फे २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत राहुरी येथील कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालेने यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. एलिमेंटरीसाठी ३१ विद्यार्थी प्रविष्ट होऊन सर्व उत्तीर्ण झाले. इंटरमिजिएटमधील १८ पैकी सर्वच विद्यार्थी यशस्वी झाले. दोन्ही परीक्षांत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी अ व ब श्रेणी प्राप्त केली. सातत्यपूर्ण मेहनत, योग्य मार्गदर्शन व कलाविष्काराला मिळालेला वाव यामुळे शाळेने घवघवीत यश मिळवले. या यशात कलाशिक्षक समीर शेख व सतीश गुलदगड यांचे मार्गदर्शन लाभले. व्यवस्थापन, मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

## खते-औषधे दुकानदारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक ; युरियासाठी सक्तीची अट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागात खते व औषधे विकणाऱ्या दुकानदारांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत असल्याचा गंभीर प्रकार समोर येत आहे. युरिया खरेदी करायचा असेल तर शेतकऱ्यांना जबरदस्तीने इतर खते किंवा औषधे खरेदी करण्याची सक्ती दुकानदारांकडून केली जात आहे.

शेतकऱ्यांनी युरियाची मागणी केल्यास, युरिया हवा असेल तर बेन्सल किंवा इतर खते-औषधे घ्यावीच लागतील, अशी अट घातली जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. काही दुकानदार थेट युरिया देण्यास टाळाटाळ करत असून, एक युरियाची गोणी देताना दुसरे खत १०/२६ घ्यायचं असेल तर भेसळखत किंवा औषध घेणे बंधनकारक केले जात आहे.



**गैरप्रकार घडत असल्यास तक्रार दाखल करा : कृषीअधिकारी**

याबाबत आमच्याकडे कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली नाही मात्र असा कोणताही प्रकार घडत असल्यास आमच्याकडे शेतकऱ्यांनी लेखी तक्रार दाखल करावी असे आवाहन तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी यांनी बोलताना केली आहे.

या प्रकारामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी अधिकच अडचणीत सापडला आहे. गरज नसलेली खते व औषधे खरेदी करावी लागत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. विशेष म्हणजे या गंभीर प्रकरणाकडे कृषी विभागातील कोणताही अधिकारी दखल घेण्यास तयार नसल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागात अशीच परिस्थिती असून, अनेक शेतकरी संतप्त झाले आहेत. युरियासारख्या अत्यावश्यक खताचा काळाबाजार रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, दोषी दुकानदारांवर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

---

## अल्पवयीन मुलीला धमकावून विनयभंग; पोक्सो अंतर्गत गुन्हा

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील पश्चिमेकडील एका गावात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला सतत लग्नासाठी भाग पाडणे, पळवून नेण्याची धमकी देणे आणि विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात पोक्सो (झजउडज) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी शालेय शिक्षण घेत असताना गेल्या एका महिन्यापासून संगमनेर तालुक्यातील तरुण आरोपी हा मुलीचा सतत पाठलाग करत होता. आरोपीने तिच्या घरापर्यंत जाऊन मला तुझ्याशी लग्न करायचे आहे असा तगादा लावत वारंवार मानसिक त्रास दिला. याशिवाय तू मानली नाहीस तर तुला पळवून नेईन अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

आरोपीच्या या कृत्यामुळे घाबरलेली आणि त्रस्त झालेली पीडित मुलगी अखेर राहुरी पोलीस ठाण्यात हजर झाली. तिच्या तक्रारीवरून आरोपी अनिल भिम राज वाघ (रा. खांबे वरंडी, ता. संगमनेर) याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ७८, ३५१ (२) तसेच पोक्सो कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे हे करीत आहेत. प्रकरण उघडकीस आल्यानंतर परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## भारदे टॅलेंट सर्च परीक्षेत राजवीर आहेर प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** भारदे साक्षरता प्रसारक मंडळ, शेवगाव यांच्या वतीने आयोजित 'एनबी टॅलेंट सर्च' परीक्षेचा निकाल जाहीर झाला. परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आव्हाणे बुद्रुक येथील विद्यार्थी राजवीर आहेर याने प्रथम क्रमांक पटकावला.




आरव काळे दुसरा, राजराजेश्वरी केदार तिसरी, अनुराधा गायकवाड चौथी तर श्लोक गोल्हार पाचवा आला. गुणवत्ता यादीतील पहिल्या १२ विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांच्या हस्ते, संस्थाध्यक्ष रमेश भारदे, परीक्षा प्रमुख रागिणी भारदे, संयोजक हरीश भारदे व प्राचार्य संजय कुलकर्णी यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

निशुल्क प्रवेश, तंत्रज्ञानाचा वापर, झटपट निकाल व उत्तम नियोजनामुळे शिक्षक व पालकांनी संयोजकांचे कौतुक केले.

---

## केवळ डागडुजी नको, कोल्हार-उदलमल घाटाचे रुंदीकरणच करा



### अन्यथा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** कोल्हार-उदलमल घाटातील रस्त्याच्या दुरवस्थेबाबत जय हिंद सेवा फाउंडेशनने आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर प्रशासनाला अखेर जाग आली आहे. आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे घाटातील खड्डे भरण्याच्या कामाला घाईघाईने सुरुवात करण्यात आली असली, तरी केवळ 'मलमपट्टी' करून चालणार नाही, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. रस्त्याचे पूर्णतः रुंदीकरण आणि डांबरीकरण झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा शिवाजी पालवे यांनी दिला आहे.

**प्रशासकीय मंजुरी असूनही काम रखडले :** या घाट रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आणि डांबरीकरणासाठी 'प्राजीमा ३९' अंतर्गत मार्च २०२४ मध्ये सुमारे २ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. संबंधित ठेकेदाराने निविदा प्रक्रिया पूर्ण करून घाटाच्या खालच्या बाजूला २ किलोमीटरचे कामही केले आहे. मात्र, उर्वरित घाटाचे मुख्य काम अद्याप रखडलेलेच आहे. घाट रस्ता अरुंद आणि खराब असल्याने यापूर्वी अनेक भीषण अपघात झाले आहेत.

> केवळ रस्त्याची मलमपट्टी करून प्रशासनाने आमची बोळवण करू नये. जोपर्यंत घाटाचे पूर्ण रुंदीकरण आणि डांबरीकरण होत नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. ठेकेदाराने आपला वेळकाढूपणा थांबवून दर्जेदार काम करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.
>
> **– शिवाजी पालवे, जय हिंद सेवा फाउंडेशन**

तर आंदोलनाचा धसका घेतल्याने ठेकेदाराने खड्डे बुजवण्यास सुरुवात केली असली, तरी हा केवळ वेळकाढूपणा असून आंदोलकांच्या डोळ्यात धूळफ`क करण्याचा प्रकार असल्याचे बोलले जात आहे.

दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेला निधी नेमका कुठे गेला? असा सवाल उपस्थित करत निधी हडप करण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय फाउंडेशनने व्यक्त केला आहे.

---

## चार दिवसांची दहशत संपली

### दोन मनोरुग्ण ताब्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** निघोज व परिसरात गेल्या चार दिवसांपासून नागरिकांना त्रास देणाऱ्या दोन मनोरुग्णांना अखेर ताब्यात घेऊन उपचारासाठी रुग्ण सह मनोयात्री पुनर्वसन केंद्र, इसळक-निंबळक येथे दाखल करण्यात आले. ही कारवाई बुधवार मध्यरात्री दोन वाजता मळगंगा-साईनाथ गणेश युवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पोलीसांच्या सहकार्याने केली.

पारनेरचे पोलीस निरीक्षक खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हेडकॉन्स्टेबल कडूस व त्यांच्या सहकाऱ्यांनी या कारवाईत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गेल्या चार दिवसांपासून हे दोन्ही व्यक्ती सहकारी संस्था, शाळा, महाविद्यालये व गर्दीच्या ठिकाणी नागरिकांना शिवीगाळ करणे, धावून जाणे, चावा घेण्याचा प्रयत्न करणे व दगडफेक करण्यासारखे प्रकार करत होते. सकाळी दहा ते बारा व संध्याकाळी सहा ते रात्री उशिरापर्यंत या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.

या संबंधी पत्रकार संघाकडून दोन दिवसांपूर्वीच पोलिसांकडे माहिती देण्यात आली होती. बुधवार सायंकाळी मळगंगा मंदिर परिसरात गर्दीत चावा व दगडफेक करण्याचा प्रयत्न झाल्यानंतर परिस्थिती गंभीर बनली. त्यानंतर सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, युवा मंडळाचे सदस्य व पत्रकारांनी तातडीने पोलिस निरीक्षक खेडकर यांच्याशी संपर्क साधला. पोलिसांनी तत्परता दाखवत रात्रभर बंदोबस्त ठेवून दोघांना ताब्यात घेतले.

या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

---

## वाजत गाजत जावून बजावला मतदानाचा हक्क

**अहिल्यानगर :** महापालिका निवडणूकीसाठी गुरुवारी मतदानाच्या दिवशी प्रभाग क्रमांक १४ मधील रेणुका रेसिडेन्सी मधील रहिवासी असलेल्या नागरिकांनी एकत्रितपणे वाजत गाजत मतदान केंद्रावर जावून मतदान केले. सर्व नागरिकांनी एकत्र येऊन लोकशाहीचा उत्सव साजरा केला.




यावेळी जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर व रेणुका रेसिडेन्सीचे सदस्य संजय गुगळे, राजेंद्र कटारिया, अजय भोईर, बार असोसिएशनच्या सह सचिव सारिका झरेकर, मिलिंद झरेकर, हिरालाल चंगेडे, प्रकाश कटारिया, खेताराम चौधरी, जयेश पोखरणा, अभय मुथा, अमित मुनोत, नूतन गुगळे, अनुराधा भोईर, सौ. संगीत कटारिया, दिपाली कटारिया आदी उपस्थित होते.

---

## शहरात बनावट ओळखपत्रांसह दोघे रंगेहाथ पकडले

**अहिल्यानगर :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील आनंद विद्यालय मतदान केंद्रावर बनावट निवडणूक ओळखपत्रांचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, यामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.मतदानाच्या दिवशी दोन संशयित व्यक्ती बनावट निवडणूक ओळखपत्रांच्या आधारे मतदान करण्याचा प्रयत्न करत असताना पकडल्या गेल्या.या दोघांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून वेगवेगळ्या नावांची शेकडो बनावट निवडणूक ओळखपत्रे आढळून आली.ही ओळखपत्रे अत्यंत शिताफीने तयार करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असून, निवडणूक प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर घातपात करण्याचा कट रचण्यात आला होता का, याबाबत आता संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या काही उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींनी जोरदार आक्षेप नोंदवला.त्यांनी हा प्रकार लोकशाहीस घातक असल्याचे सांगत तत्काळ सखोल चौकशीची मागणी केली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.१६ जानेवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने लंपास

**राहुरी :** शहरातील साईनगर येथे अज्ञात भामट्यांनी रात्रीच्या दरम्यान एका महिला डॉक्टरचे बंद घराचे कडी कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटात असलेले ५ तोळे वजनाचे सोन्याचे दागीने पळवून नेल्याची घटना दि. १४ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. डॉ. नयन दिपक तोडमल, वय ३२ वर्षे, ह्या राहुरी शहरातील साईनगर येथे त्यांच्या कुटुंबासह राहत असुन त्यांचे राहुरी येथे साईदीप डेन्टल क्लिनिक नावाने क्लिनिक आहे. डॉ. नयन तोडमल यांच्या मुलगा आजारी असल्या कारणाने ते दि. १३ जानेवारी रोजी रात्री १० वाजे दरम्यान त्यांच्या घराला कुलूप लावून रुग्णालयात गेले होते. दि. १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजे दरम्यान डॉ. नयन तोडमल ह्या त्यांच्या घरी गेल्या असता घराचा कडीकोंडा व कुलूप तुटलेले त्यांना दिसले. या दरम्यान अज्ञात भामट्यांनी पहाटेच्या सुमारास डॉ. तोडमल यांच्या घरात प्रवेश केला. घरातील सामानाची उचकापाचक केली. त्या घरातील कपाटात असलेले ५ तोळे वजनाचे सोन्याचे दागीने चोरुन नेले. तसेच घरातील सीसीटीव्ही कॅमेर्याचा डिव्हीआर देखील काढून नेला.

## अपुऱ्या नुकसान भरपाईमुळे
# शेतकऱ्यांचे गोदावरीत जलसमाधी आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** अतिवृष्टी नुकसान भरपाईत कमी रक्कम देण्यात आल्याने निर्माण झालेल्या तफावती विरोधात शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अँड अजित काळे व तालुका अध्यक्ष गणेश तांबे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (दि.१५) सकाळपासून नागमठाण ता. वैजापूर येथील गोदावरी पुलावर जलसमाधी आंदोलन सुरू करण्यात आले. प्रशासनाने वैजापूर तालुक्यात केवळ ६,५०० रुपये प्रतिहेक्टर प्रमाणे अनुदान देण्यात आले,पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर हंगामी बागायत पिकांसाठी सरसकट १७ हजार रुपये प्रतिहेक्टर अनुदान देण्यात यावे आशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली असल्याने आज हे आंदोलन सुरू करण्यात आले होते मात्र या आंदोलनाची दखल आमदार रमेश बोरनारे यांनी घेऊन आयुक्तांशी चर्चा करून ठोस जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे ठोस आश्वासन दिल्याने सायंकाळी उशीराने आंदोलन मागे घेण्यात आले.

पश्चिम महाराष्ट्र जिल्ह्यातील शेतकऱ्यांप्रमाणे हेक्टरी १७ हजार अतिवृष्टी भरपाई मिळावी.तसेच फार्मर आयडी व ई-केवायसीची अट रद्द करून तात्काळ अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे या प्रमुख मागण्या होत्या. अनेक वेळा उपोषण करूनही दखल न घेतल्याने शेकडो शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलनाचा



ईशारा दिला होता. लेखी आश्वासन दिल्याशिवाय आंदोलन थांबरनाही असा पवित्रा आंदोलकांनी घेतल्याने सायंकाळी उशिरापर्यंत आंदोलन सुरुच होते. या आंदोलनास आमदार रमेश पाटील बोरणारे, बाजार समितीचे अध्यक्ष रामहरी जाधव, भागिनाथ मगर, माजी अर्थ व बांधकाम सभापती अविनाश गलांडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष लताताई पगारे, संजय बोरणारे, माजी जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे, शिवसेना उप तालुका प्रमुख डॉ. प्रकाश शेळके, बाळासाहेब जानराव, प्रकाश ठुबे, अॅड. प्रतिप निंबाळकर, बाजार समितीचे संचालक प्रविण पवार, नारायण विखे, संभाजी डांगे, रंजित चव्हाण, भाऊराव भराडे, सतिष शिंदे, उदयसिंह ( बंटी )पवार, पवन चव्हाण, बद्रिआण्णा चव्हाण, रामनाथ तांबे, गणेश तांबे, भिमाशंकर तांबे, सिताराम भराडे, नितिन जोशी, अमृत शिंदे, देविदास सामसे, वैजापूर अग्निशामदल व संभाजीगर पदम पूरा आग्निशामक दलाचे ए.एन खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विनायक कदम, हरिभाऊ घुगे, महसुल प्रशासना कडुन नायब तहसिलदार पेटारे, कुमावत मंडळ अधिकारी नागमठाण आर.बी. सुराळे, तलाठी अक्षय सव्वालाखे, श्रीकांत म्हस्के, मंगला वाघमारे, संदिप पवार, अग्निशामक दलाचे फायरमन दिनेश मुंगसे, प्रसाद शिंदे, शिवसंभा कल्याणकर, प्रणाल सुर्यवंशी, शेख मतिन, शशिकांत गिते. उप विभागिय अधिकारी भागवत फुंदे,विरगांव पोलिस हजर होते.

### ■ २४ तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

जिल्हाअधिकारी यांनी येत्या २४ तारखेला कार्यालयात बैठक घेऊन अतिवृष्टी अनुदानाचा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन आमदार रमेश पाटील बोरणारे यांच्या मध्यस्थीने दुरध्वनीवरुन आश्वासन दिल्यानंतर स्थगित करण्यात आले.

## टाकळीभान उपबाजार समितीत तोडफोड व मारहाण
# वे-ब्रिज कर्मचाऱ्याकडील २,४८० रुपये लुटले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** टाकळीभान येथील कृषी उत्पन्न उपबाजार समितीमध्ये कार्यरत असलेल्या वे-ब्रिज कार्यालयात घुसखोरी करून शिवीगाळ, मारहाण, तोडफोड व रोख रक्कम हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना रविवारी दि. ११ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता घडली. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय अनिल पोलादे (वय २८), व्यवसायाने कनिष्ठ लिपीक, रा. बोरावके नगर, श्रीरामपूर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ते टाकळीभान उपबाजार समितीच्या वे-ब्रिज कार्यालयात नेहमीप्रमाणे काम करत असताना टाकळीभान गावातील अप्पासाहेब नानासाहेब रणनवरे (वय ३५) व त्याचे दोन अनोळखी साथीदार अचानक कार्यालयात आले. कोणतेही कारण नसताना त्यांनी हा काटा काय तुझा आहे का, बंद पाडून टाकीन अशी धमकी देत शिवीगाळ सुरू केली.

दरम्यान, कार्यालयातील टेबलावर ठेवलेली वे-ब्रिजची रोख रक्कम हिशोब करत असताना आरोपीने ती जबरदस्तीने हिसकावण्याचा प्रयत्न केला. यावेळी आरोपीने किबोर्ड व वे-ब्रिजचे साहित्य फेकून देत तोडफोड केली.

तसेच कार्यालयातील कर्मचारी वैभव रणनवरे व सागर गायकवाड यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही मारहाण करून मध्ये आलात तर तुमचाही काटा काढू अशी धमकी देण्यात आली. या घटनेत आरोपीने टेबलावर ठेवलेली एकूण २,४८० रुपयांची रोख रक्कम (५००, १००, ५०, २० व १० रुपयांच्या नोटा) हिसकावून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. उपबाजार समितीसारख्या सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# प्रवरेच्या गायत्री आणि गौतमी या जुळ्या बहिणींची खेलो इंडिया हॉकी स्पर्धेसाठी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** केंद्र शासन निर्देशित क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने यश अर्कॅडमी सोनई येथे ट्रायबल खेलो इंडिया राज्यस्तरीय हॉकी निवड चाचणी पार पडली यामध्ये लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील

प्रवरा कन्या विद्या मंदिरच्या गायत्री आणि गौतमी महादू गांगुर्डे या जुळ्या भगिनींची निवड महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली. अशी माहिती प्राचार्या विद्या घोरपडे यांनी दिली.प्रवरेच्या शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच खेळासाठीही विविध सेवा सुविधा





या विद्यार्थ्यांना दिल्या जातात भव्य क्रीडांगणासह गुणवंत खेळाडूंसाठी विशेष मार्गदर्शन प्रवरा स्पोर्ट अर्कॅडमीच्या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहे. उत्तम खेळाडू घडावेत यासाठी क्रीडा साहित्य आणि प्रशिक्षण हे दिले जाते. याम ुळेच प्रवरा आज विविध खेळ प्रकारात देश आणि जागतिक पातळीवरती पोहोचली आहे असे असे प्राचार्य घोरपडे यांनी सांगितले. प्रवरा कन्या विद्या मंदिरच्या माध्यमातून हॉकीसाठी मिळालेले मार्गदर्शन आम्हाला महत्त्वपूर्ण ठरले या ठिकाणी शैक्षणिक अभ्यासाबरोबरच खेळाला देखील विशेष महत्त्व दिल्याने आम्हा जुळ्या बहिणींना हे यश मिळवता आल्याचे गायत्री आणि गौतमी या जुळ्या बहिणींनी सांगितले. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा ना. राधाकृष्ण विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे यांनी अभिनंदन केले आहे.

# गोगलगाव येथे बिबट्या जेरबंद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** राहाता तालुक्यातील गोगलगाव येथील गिते सोसे वस्तीवर (पांढरी वस्ती) भाऊसाहेब रखमा खाडे यांच्या गट नंबर ७९ मध्ये बिबट्या जेरबंद करण्यात वनविभाग व प्राणीमित्र यांना यश आले.

गेल्या महिन्यापासून गोगलगांवात धुमाकूळ घालणारा बिबट्या कोंबडीच्या सावजाला आकर्षून पिंजऱ्यात जेरबंद झाला. चार पाच दिवसापासून हा बिबट्या पिंजऱ्या भोवती फिरत होता पण पिंजऱ्यात जात नव्हता परंतु काल बुधवार दिनांक १४/१/२०२५ रोजी बिबट्याच्याच पिंजऱ्यात ठेवलेल्या कोंबडीला आकर्षून तो अलगत जेरबंद झाला.

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक प्रतिक गजेवर व प्राणीमित्र विकास म्हस्के घटना स्थळी पोहचले व सहाय्यक उपवनसंरक्षक अधिकारी गणेश मिसाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी मेहबूब शेख यांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच वनरक्षक प्रतिक गजेवर, प्राणीमित्र विकास म्हस्के, आपत्कालीन समितीचे अनिल जाधव, मंडू खेमनर हे घटनास्थळी जाऊन पंचनामा केला जेरबंद बिबट्या हलविण्याची कार्यवाही केली. जेरबंद झालेला बिबट्या हा चार वर्षं वयाचा नर जातीचा होता. बिबट्या जेरबंद झाल्यानंतर बिबट्या पाहण्यासाठी परिसरातून खुप लोकं जमा झाली होती. या गर्दीला पांगवण्यासाठी सरपंच भाऊसाहेब खाडे, पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामप्रसाद मगर,अनिल सोसे, प्रशांत सोसे, सुरेश गिते , राहुल चौधरी, सौरभ चौधरी, गणेश गुजर, पुंजा सातकर मदत केली. हा एक बिबट्या जरी पकडला तरी अजुन दोन बिबटे परिसरात आहे तरी कृपया याच भागात परत पिंजरा लावावा अशी मागणी गोगलगाव ग्रामस्थांनी केली.

# शिंगवे अॅट्रासिटी प्रकरणी एकास अटक, तिघे फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील शिंगवे येथे मागील अवडयात दाखल झालेल्या ट्रोसिटी प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात पोलीसांना यश आले असून तिघे जण फरार आहेत.

शिंगवे येथे दि ११ रोजी मातंग वस्तीत सवर्ण समाजातील गोवर्धन रामराव बर्गे , कार्तीक गोवर्धन बर्गे, अश्विन गोवर्धत बर्ग व सागर शिवाजी काळे यांनी दहशत माजवून जातीवाचक शिवीगाळ करत अण्णा भाऊ साठे चौकात येवून दहशत निर्माण करून मातंग तरुणांना मारहाण करण्यात आली होती . या प्रकरणी नंदू पगारे यांनी राहाता पोलीस ठाण्यात ट्रोसिटी व आदी कलमा सह गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी शिर्डी यांचे कडे असल्याने त्यांचे पथकाने शिंगवे शिवारातून कार्तीक गोवर्धन बर्गे यास दाखल गुन्ह्याचे दुसऱ्या दिवशी अटक केली आहे. आदी तीन आरोपीच्या मागावर पोलीस असून लवकरच ते गजाआड असतील असा पुनरुच्चार डीवाय एसपी अमोल भारती यांनी केला आहे.

### ■ राहाता पोलीसांचे आरोपींना अभय : नातेवाईकांचा आरोप

गुन्हा ज्या दिवशी दाखल झाला त्याच दिवशी राहाता पोलीस ठाण्यात हजर होते . पोलीसांनी त्यांना पोलीस ठाण्यात बसवून ठेवले होते, परंतू इकडे गुन्हा लिहिण्याचे काम सुरू असताना पोलीसांनी आरोपींशी अर्थपुर्ण संबंध जोपासून त्यांना सोडून दिले. ज्या पोलीसाने त्यांना सोडले त्या दोषी पोलीसांवर कारवाई करण्यात यावी तसेच फरार आरोपींना त्वरीत अटक करण्यात यावी अन्यथा डीवायएसपी कार्यालया समोर तमाम समाजाकडून तिव्र अंदोलन छेडले जाईल असा इशारा पिडीत नातेवाईकांनी दिला आहे.

# कृषी यांत्रिकीकरणाला चालना
## योजनांची जागृती बांधावर करा : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून कृषी यांत्रिकीकरणास मोठ्या प्रम ाणात प्रोत्साहन देण्यात येत असून, योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा म्हणून कृषी विभागाने योजनांची जागृती बांधावर जावून करावी असे आवाहन जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



तालुक्यातील पिंपळवाडी, रामपूरवाडी, आडगाव, नांदूर, शिर्डी, पुणतांबा आशा गावांमधील अकरा शेतकऱ्यांची कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या माध्यमातून कम्बाईन हार्वेस्टर या घटकासाठी निवड झाली. मंजूर झालेल्या हार्वेस्टरचे वितरण मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कृषी यांत्रिकीकरण योजने करीता तालुक्यातील १३ हजार २४१ शेतकऱ्यांची निवड झाली आहे. आतापर्यत २२५ शेतक-यांना ट्रॅक्टरचा लाभ घेतला असून, यासाठी २ कोटी ७२ लाख रुपयांचे अनुदान मंजुर झाले असून, ट्रॅक्टरचलित औजरांसाठी ७१४ शेतक-यांची निवड झाली असून यासाठी ६ कोटी ६७ लाख रूपयांचे अनुदान मंजूर झाले असल्याचे ना.विखे पाटील म्हणाले. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून कृषी विकासाला गती देताना नविन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावे म्हणून योजनांची अंमलबजावणी होत आहे. शिर्डी विधानसभा मतदार संघात अनेक शेतकरी प्रयोगशील शेतीच्या माध्यामातून करीत असलेल्या प्रगतीला शासन योजनांचे पाठबळ मिळवून देण्यासाठी कृषी विभागाने योजनांची जागृती गावा बरोबरच शेतकऱ्यांच्या बांधापर्यत करण्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. याप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, मंडल अधिकारी रमेश चोपडे, अभय बोरसे, सचिन गायकवाड यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# समाज जात-धर्मात गुंतला
## पैसा, गुंडशाहीपुढे विद्वत्ता शहाणपण चालत नाही : इंदोरीकर महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** समाज जात अन् धम ात गुंतलेला असून पैसा, गुंडशाही सत्तेपुढे अध्यात्मिक ज्ञानेश्वरी, गाथा अन् विद्वत्ता शहाणपण चालत नसल्याचे प्रतिपादन सम ाजप्रबोधनकार इंदोरीकर महाराज देशमुख यांनी श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान येथील धर्मनाथ बीज उत्सव सोहळा किर्तनातून उपस्थित भाविकांना उपदेश करताना केले.

श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान भामाठान येथे सुरू असलेल्या धर्मनाथ बीज उत्सव सोहळ्यात आज गुरुवार दि.१५ रोजी सकाळी १०.३० वाजता निवृती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे हजारो महिला पुरुष अबालवृद्ध भाविकांच्या उपस्थितीत किर्तन संपन्न झाले.काकडा मालिकेतील तिसऱ्या अभंगावर भाविकांसमोर उपदेश करताना महाराज पुढे म्हणाले की संत मालिकेतील निवृत्तीनाथ हे पहिले संत होय. संत तुकाराम महाराज,,संत ज्ञानेश्वर,संत सावंता महाराज आदी संतानी जाती धर्माच्या पलीकडे जाऊन विशिष्ट एका जातीला नव्हे तर तमाम सर्व समावेशक जातीच्या समाजाला आपल्या अभंगवाणी तून उपदेश केलेला आहे. असुरी संपत्ती मुळे रावणाची सोन्याची लंका जळून भस्म झाली. धृतराष्ट्राची काय अवस्था झाली.पुण्य केलं की स्वर्ग पाप केले की नर्क या उक्तीप्रमाणे माणूस जीवनाकडे पाहतो. महाराजांनी पापाचे शुभ अशुभ सोळा प्रकार सविस्तर विशद केले.जिवनात सर्वाला माफी असून कर्माला माफी नाही कार्यक्रमच होणार. हा विचार समोर ठेवून हसत हसत जीवन जगा. अंगातली ताकद अन् खिशातला पैसा संपला की माणसाची वाट लागते.नितीवान माणूस गरीब राहीला तरी सुखाने जगू शकतो.

मी सद्यस्थिती मर्मावर बोट ठेवून बोलतो



त्यामुळे माझे बोलणे नेमके झोंबते. लोक गोड बोलुन जे करायचे ते करतात त्यांची समाज वाहवा करतो. म ाझं वक्तव्य झोंबणारे लोक माझा कार्यक्रम करतात.मी बत्तीस वर्षांपूर्वी तळमळीने पोटतिडकीने समाजहितासाठी सांगितलेल्या गोष्टी समाजाने मनावर घेतल्या नाहीत. ज्यांनी अंगिकारल्या नाहीत तेआता पश्चात्ताप करत असल्याचे शेवटी इंदोरीकर महाराज म्हणाले.

यावेळी बबनराव मुठे, सरपंच सागर मुठे , संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पवार,कारेगांव भागचे व्हा चेअरमन शिवाजी मुठे, माजी सरपंच उत्तमराव बनसोडे, माजी चेअरमन भाऊसाहेब बनसोडे, दिनकर बनसोडे,किशोर बनसोडे, मोहन वतीने, आदी उपस्थित होते. सेवानिवृत्त गटविकास अधिकारी शाम पुरनाळे, शिक्षणाधिकारी सौ. सुलोचना पुरनाळे दांपत्याचे वतीने आमटी भाकरी महाप्रसाद पगंती देण्यात आल्या.

### ■ माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी घेतले अडबंगनाथ तपोभूमीचे दर्शन

आज दुपारी किर्तनानंतर रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या रामायण कथेस माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी उपस्थिती लावून अडबंगनाथ तपोभूमीचे शीळेचे दर्शन घेऊन समाधान व्यक्त केले. मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांनी त्यांचे स्वागत करून संस्थानचे वतीने सत्कार केला. त्यांच्यासमवेत आमदार हेमंत ओगले, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, सरचिटणीस ज्ञानेश्वर मुरकुटे, दशरथ वरपे, संजय कुंटे, प्रमोद भोसले उपस्थित होते.

----------

### ■ गोदाकाठ पट्ट्यातील गोरगरीब भक्ताचं चालतं बोलतं ब्रह्म - नारायणगिरी महाराज

तरूण वयापासून अखेरपर्यंत सद्गुरू नारायण गिरी महाराज यांच्या रोमारोमात भक्तीचा संचार होता. शंभरी गाठूनही हाताला दोर बांधून सहा सहा तास उभे राहुन किर्तन करत. गितेतील एका एका ओवीवर आठ आठ तास विवेचन करत. परिसरातील गोरगरीब कष्टकरी शेतकरी पती पत्नीला गाडीतून उतरून दर्शन देत. मनाला आले तर त्यांच्यासमवेत शेतात चटणी भाकरी सेवन करत. अशा या थोर महात्म्याचे पाय या अडबंगनाथ तपोभूमीस लागले.अन अरूणगिरी महाराजांच्या हातून या उपेक्षित जंगलातल्या देवस्थानचे नंदनवन करून घेतले.